# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ०५/०१/२०१३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शनिवार दिनांक ०५/०१/२०१३ रोजी सभा सुचना क्र. ०२ दि. ०१/०१/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. राजु यशवंत भोईर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

१. श्री. राजु यशवंत भोईर
२. श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद
३. श्रीम. अनिता जयवंत पाटील
४. श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो
५. श्री. मुन्ना सिंह
६. श्री. प्रमोद जयराम सामंत
७. श्री. राजेश शंकर वेतोस्कर
८. श्रीम. बगाजी शर्मिला विल्सन
९. श्री. रोहिदास शंकर पाटील
१०. श्री. शरद केशव पाटील
११. श्रीम. मिरादेवी यादव
१२. डॉ. राजेंद्र जैन
१३. श्री. संदिप मोहन पाटील
१४. श्री. प्रविण मोरेश्वर पाटील
१५. श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी

**गैरहजर सदस्य – निरंक**

**मा. सभापती :-**

उपस्थित स्थायी समितीचे सर्व सन्मा. सदस्य सर्व प्रशासकीय अधिकारी तसेच उपायुक्त साहेब सर्वांना नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा. तसेच मिरा भाईंदर शहराचे प्रथम आमदार मा. श्री. गिल्बर्ट मेन्डोसा, बहुजन विकास आघाडीचे वसई-विरार चे अध्यक्ष, लोकनेते हितेंद्र ठाकुर साहेब, शहराच्या महापौर कॅटलिन परेरा मॅडम, उपमहापौर नुरजहाँ हुसेन मॅडम तसेच सर्व राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नगरसेवक, राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व नगरसेवक, अपक्ष तुमच्या या सर्वांच्या सहकार्याने माझी स्थायी समिती सभापती पदी निवड झाल्याबद्दल मी सर्वांचे आभार प्रकट करतो. तसेच येणारी सभा आणि पुढील वर्षी होणाऱ्या सभा आहेत यामध्ये सर्व सन्मा. सदस्यांनी सहकार्य करावे अशी मी अपेक्षा ठेवतो. आणि या सभेला सुरुवात करावी अशी मी सचिवांना विनंती करतो. धन्यवाद.

**प्र. नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शनिवार दि. ०५/०१/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०२, दि. ०१/०१/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**मा. सभापती :-**

मा. उपायुक्त साहेबांना विनंती करतो की, सभा चालू होताना सर्व संबंधित अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याची विनंती करतो.

**मा. उपायुक्त :-**

मी आपली ओळख करुन देतो. मी उपायुक्त सामान्य प्रशासन विलास ढगे. सर्व विभाग प्रमुखांना सभेसाठी हजर राहण्यासाठी लेखी सुचना काढण्यात येतील. आणि सर्व विभाग प्रमुखांना यापुढे सूचना अशा आहेत की, कोणत्याही कारणास्तव म्हणजे आपण सभेला उपस्थित राहू शकत नसाल, वैयक्तिक असेल, रजेवर असेल किंवा कार्यालयीन कामकाजामुळे, न्यायालयीन कामकाजामुळे जर सभेला हजर राहु शकत नसतील त्याची पुर्व कल्पना मा. सभापती साहेबांना दयायची आणि तसेच विभाग प्रमुखांची अनुमती घ्यायची आहे.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय, आज एवढे महत्वाचे विषय आहेत आणि प्रभाग अधिकारी नाही. तुम्हालाही त्यांनी अध्यक्ष म्हणून कल्पना दिलेली नाही. ते का आले नाही त्याचे कारण सांगा? महत्वाचे विषय आहेत. स्टँडिंग कमिटी मिटींग आहे. आज ड्युटीवर आहेत की नाही असेल तर त्यांना बोलवून घ्या.

**संदिप पाटील :-**

पहिल्या मिटींगला हजर राहणे जरुरी आहे.

**हेलन गोविंद :-**

पहिली मिटींग आहे. ते कामात असतील. राहु दया. साहेब, तुम्ही मिटींग चालू करा. उपायुक्त साहेब आहेत ना ते त्यांना सांगतील ना पुढच्या मिटींगमध्ये हजर राहण्यासाठी.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, सभेच कामकाज निटनेटके व्हावे म्हणून ते विचारतात. आयुक्त जर महापालिका कार्यालयात असतील आणि आले नाही तर तो विषय वेगळा आहे. आयुक्त महापालिका कार्यालयात नसतील त्यांना सुचना केली असेल, फॅक्स केला असेल, फोन केला असेल तर सांगावे की रजेवर आहेत, शासकीय कामासाठी गेले. तर ते रेकॉर्डवर राहिल ना. एवढाच त्यांचा प्रश्न आहे.

**संदिप पाटील :-**

मा. सभापती साहेब, मी एक सुचना मांडतो. आपल्या या स्टँडिंगच्या मिटींग असेल त्या टाईमाला सर्व अधिकारी आणि आयुक्त साहेब जर आयुक्त साहेब नसतील तर उपायुक्त साहेब हजर रहावे. विशेष प्रभाग अधिकारी आणि संबंधित अधिकारी हे सगळे इथे उपस्थित पाहिजे.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. हा विषय आपण घेवू. ह्याच्यापुढे जे काय कोणाची कारणे असतील त्याचे आपण आधीच माहिती घेवू. आणि सभा चालू असताना सर्वांनी मध्येमध्ये गोंधळ घालण्याचा प्रयत्न करु नका. सभा चालवताना व्यवस्थित चालवा. आता सर्व सदस्य एकाच टाईमाला बोलायला लागले. आपण सर्व समजदार लोक आहेत.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, एकतर गोंधळ घालता, हा शब्द काढून टाका कामकाजातुन. कारण गोंधळ कोणी घातलेला नाही. व्यवस्थितपणे प्रश्न विचारत आहेत.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. पण आपण ह्याच्यापुढे लक्ष ठेवू. सचिव साहेब, तुम्ही कामकाजाला सुरुवात करा.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र.२, दि. १७/०५/२०१२, दि. २२/०५/२०१२, दि. २९/०५/२०१२ व दि. ०६/०७/२०१२ रोजीचे मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**रोहिदास पाटील :-**

मा. उपायुक्त सो. तुम्ही सन्मा. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दिलेच नाही. आपल्याला शासकीय कामकाज आहे. आपली महापालिका चालते. आज आयुक्त महापालिकेत आहेत की नाही एवढच विचारल. त्यांनी रजेचा अर्ज केला आहे का? की प्रशासकीय कामकाजासाठी गेले काही तरी इन्टीमेट केल असेल की नाही.

**मा. उपायुक्त :-**

मा. आयुक्त साहेब, मंत्रालयामध्ये आपल्या महापालिकेच्या कामकाजासाठीच गेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

बस. हेच जर तुम्ही आधी बोलले असते तर आम्ही चारवेळा विचारल नसत. आणि आम्ही चारवेळा विचारल त्यांना गोंधळ वाटला, तो वाटला नसता.

**मा. उपायुक्त :-**

मा. सभापती साहेब, मी अगोदरच सांगितल होते की, आयुक्त साहेब मंत्रालयामध्ये गेले आहेत. कदाचित एकाच वेळी सर्व बोलत होते म्हणुन त्यावेळेला लक्षात आल नसेल.

**बर्नड डिमेलो :-**

दि. १७/०५/२०१२, दि. २२/०५/२०१२, दि. २९/०५/२०१२ व दि. ०६/०७/२०१२ रोजींच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**राजेश वेतोसकर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रमोद सामंत :-**

साहेब, माझी सुचना आहे. चार मिटींगचे इतिवृत्तांत एकदम आले. आणि यावेळेला आता गेल्यावेळेचे कोणतेच सभासद इथे नाही आहेत. पण मला असं सांगायचे आहे की, प्रत्येक मिटींगच इतिवृत्तांत प्रत्येक मिटींगमध्ये द्या.

**प्र. नगरसचिव :-**

अल्टरनेट येतील. हे पाच-पाच दिवसाने मिटींग झालेल्या आहेत.

**प्रमोद सामंत :-**

आम्ही ह्यात दुरुस्त्या सुचवू शकत नाही.

**प्र. नगरसचिव :-**

मागच्या ज्या मिटींग झाल्या आहेत ना त्या पाच-पाच दिवसाच्या अंतरावर झालेल्या आहेत आणि इतर अनेक काम म्हणजे सुनावण्या पण असतात ना.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०२ :-**

दि. १७/०५/२०१२, दि. २२/०५/२०१२, दि. २९/०५/२०१२ व दि. ०६/०७/२०१२ रोजीचे मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ०२ :-**

दि. १७/०५/२०१२, दि. २२/०५/२०१२, दि. २९/०५/२०१२ व दि. ०६/०७/२०१२ रोजींच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. राजेश वतोसकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र.३, महानगर गॅस लिमिटेड यांना सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षणातील जागा भाड्याने देणे बाबत.

**बर्नड डिमेलो :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत सर्व भागात महानगर गॅस लिमिटड मार्फत गॅस लाईन टाकण्याचे काम सुरु असून त्यांनी खालील दोन ठिकाणी ५.०० मीटर X ४.०० मीटर साईजची जागा डी.आर.एस बसविण्यासाठी भाडयाने मागितलेली आहे.

१) भाईंदर (पूर्व) टाऊन पार्क मागे आरक्षण क्र. २५९ (आरक्षणाच्या एका कॉर्नरला)

२) भाईंदर (प.) आरक्षण क्र.१०० (रेल्वे जवळील आरक्षणाच्या कॉर्नरला)

वरील दोन ठिकाणी २०.०० चौ.मीटर जागेचे अनुक्रमे रु. १७,२७०/- व रु. २०,०२०/- एवढे वार्षिक भाडे चालु बाजार भावानुसार (रेडी रेकनर नुसार) होत आहे. सदर भाडे भरण्यास महानगर गॅस लिमिटेड तयार आहेत.

तरी सदर दोन जागा तीन वर्ष मुदतीसाठी करारनामा करुन महानगर गॅस लिमिटेड यांना वरील प्रमाणे भाडे घेऊन देण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ नूसार मान्यता देण्यात येत आहे.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रशांत दळवी :-**

अध्यक्ष महोदय, प्रकरण क्रमांक ३ चे धोरण ठरवलेल आहे का?

**राजेंद्र जैन :-**

अभी यह ३ साल का बढा दिया रेडी रेकनर है। रेडी रेकनर रेट हरसाल बदलती है। तो आजकी रेट से ३ साल का भाडा क्यों? हर साल १५ से २०% इन्क्रीमेंट क्यों नही किया? यह करेंगे तो महानगरपालिका को फायदा होगा।

**शरद पाटील :-**

आपण महानगरपालिकेच्यादृष्टीने इन्कम बाबत आपण नुकसान करित आहोत. या नुकसानाला जबाबदार कोण असेल?

**प्रशांत दळवी :-**

आरक्षणाची जागा भाडयाने दयायची. त्याबाबत धोरण ठरवल आहे का?

**बर्नड डिमेलो :-**

हा सभागृहाच्या हिताचा आहे, शहराच्या हिताचा आहे, लोकांच्या उपयोगी पडणारी वस्तु आहे.

**शरद पाटील :-**

असु द्या ना.

**बर्नड डिमेलो :-**

तुम्हाला विरोध दर्शवायचा असेल तर विरोध दर्शवा.

**शरद पाटील :-**

विरोध करायचा असेल तर करु. तुम्हाला सांगायची गरज नाही.

**मा. सभापती :-**

डॉ. साहब ने जो सवाल उठाया है, उस बारेमे बोलता हुँ की, संबंधीत अधिकारी जो है वह खुलासा करेंगे।

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, महानगर गॅस लिमिटेड रेडी रेकनर हा दरवर्षी बदलत असतो. या करन्ट वर्षासाठी जे भाड आहे. आणि जस बदलेल त्यांना प्राथमिक आपण ३ वर्षासाठी देतो. परंतु, त्यांच्याकडून दरवर्षी भाड हे रेडी रेकनर नुसार भरुन घेणार आहोत. तुमचा जो मुद्दा आहे की, ३...............

**राजेंद्र जैन :-**

इसमें लिखा हुआ नही है।

**शिवाजी बारकुंड :-**

लिखा हुआ नही। उनको जो लेटर देते है, ठराव होने के बाद उसमें हर साल का रेडी रेकनर का जो रेट रहेगा उसके हिसाब से भाडा मिलेगा।

**शरद पाटील :-**

तस असेल तर तसा गोषवारा दयाना. तुम्ही गोषवारा दिला असता तर आम्हाला बोलायची गरज नसती. विचारायची पण गरज नसती.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला आरक्षण मधली जागा दयायचा अधिकार आहे का? २५९ हे आरक्षण कोणते आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

२५९ हे आरक्षण हायस्कुल आणि प्ले ग्राऊंड आहे. याचा एरिया आहे. ९ हजार ७२ स्क्वेअर मीटरचा. त्याच्यापैकी आपण फक्त २० स्क्वेअर फिट जागा त्यांना देणार आहे.

**रोहिदास पाटील :-**

गॅससाठी देतो म्हणजे काय देतो?

**शिवाजी बारकुंड :-**

महानगर गॅस म्हणजे पाईप गॅस पुरवठा करतो. सिलेंडर हळुहळु टप्याटप्याने बंद होणार आहेत. जर पाण्याच्या पाईप लाईनने पाणी पुरवठा केला जातो. तसाच पाईपद्वारे गॅसपुरवठा होणार आहे. आणि त्या लोकांना २० स्क्वेअर मी. ....................

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला माहित असेल तर जर ते शाळेच आरक्षण आहे. तिथे नक्की शाळा होणार आहे. मग शाळेच्या आरक्षणाच्या जागेमध्ये गॅसच्या ह्याला परवानगी राहते का? अशी माहिती काढले का? किती सराऊंडिंग एरियामध्ये सिलेंडर ठेवता येणार नाही, गॅसचा वापर करता येत नाही. गॅसच कोणत जंक्शन बांधता येत नाही असे नॉम्स् आहेत. नॉर्म्स पुर्ण असेल तर तुम्ही होय म्हणा. नसेल तर नाही सांगा.

**शिवाजी बारकुंड :-**

नॉम्स् प्रमाणे आहे.

**प्रशांत दळवी :-**

साहेब, आरक्षणाची जागा भाडयाने देण्याबाबत काही धोरण ठरवलेल आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

धोरण म्हणजे मा. स्थायी समिती पुढेच आणलेले आहे.

**प्रशांत दळवी :-**

मा. स्थायी समितीपुढे आणले. पण हा प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्याचा..............

**शिवाजी बारकुंड :-**

भाडे ठरवण्याचा पूर्ण अधिकार पूर्ण मा. स्थायी समितीचा आहे. मा. स्थायी समितीने त्याच्यावर विचार करुन ठरवा.

**शरद पाटील :-**

भाडे ठरवण्याचा अधिकार स्थायी समितीकडे आहे. पण जागा देण्याचा अधिकार स्थायी समितीचा आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

आहे ना.

**प्रशांत दळवी :-**

मा. महासभेत असा प्रस्ताव कुठे ठेवला आहे?

**बर्नड डिमेलो :-**

ज्यांना माहित असेल त्यांना तुमच्या कार्यालयामध्ये बोलवा आणि ती माहिती घ्या.

**शरद पाटील :-**

मग, उदयापासुन स्टँडिंग बोलवू नका ना केबिन मध्येच आपण विचारु.

**शिवाजी बारकुंड :-**

आमच स्पष्ट मत आहे. ९ हजार स्क्वेअर मीटरच रिझर्व्हेशन आहे. त्यातुन फक्त २० स्क्वेअर दयायची आणि हा पाईप गॅस त्या भागातल्या नागरिकांनाच उपयोगी येणार आहे. आणि दुसर जे आहे रिझर्व्हेशन १०० ते ५ हजार ७६० स्क्वेअर मीटरचा एरिया आहे. त्याच्यामधली पण फक्त २० स्क्वेअर मीटर म्हणजे फार थोडी जागा लागणार आहे. आणि हे पब्लिकच्या सोयीसाठी देण आवश्यक आहे.

**प्रविण पाटील :-**

आरक्षण ताब्यात आलेले आहे का?

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, त्यांनी तो नियम आम्हाला वाचून दाखवायला सांगा ना?

**प्रमोद सामंत :-**

बेसिकली हा विषय निगडीचा आहे. या विषयामध्ये भाईंदर ईस्ट, भाईंदर वेस्टला महानगर गॅसचे वितरण झाले पाहिजे. यासाठी आपण जागा सुचवलेली आहे. आणि याच्यावर निर्णय घेण एकदम गरजेच होत. तर आपण जास्त चर्चा ह्यावर न करता लोकांच्या हिताचा विचार करता ही जागा दिली पाहिजे. आणि फक्त २० स्क्वेअर मीटर जागा आपण देतो.

**शरद पाटील :-**

विषय लोकांच्या हिताचा आहे यात दुमत नाही. त्याच्यासाठी आमचा विरोध नाही. पण, कायदेशीररित्या, टेक्नीकलीरित्या त्यांनी त्यांचा नियम वाचून दाखवा ना. बारकुंड साहेबांनी सांगितल त्यांनी आम्हाला कलम वाचून दाखववावा. आरक्षण जे शाळेसाठी आहे ते आपण दिल. ते योग्य आहे की नाही याचा खुलासा करावा.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती साहेब, आम्ही कुठे भांडण करतो, नाहीतर एक काम करा, माझी एक विनंती राहील तुम्हाला, सर्व ठराव तुम्ही एकत्र घ्या, वाचुन दाखवा आणि पास करुन घ्या. इकडे चर्चाच करायची नसेल, चर्चाच होणार नसेल, कोण बोलणार नसेल आणि आम्हाला काही समजणार नसेल, तर मग ..........

**शरद पाटील :-**

आपण अधिका-यांना का संरक्षण देता? त्यांची ती ड्यूटी आहे.

**मा. सभापती :-**

अधिका-यांनी खुलासा केलेला आहे.

**शरद पाटील :-**

त्यांनी कुठे खुलासा केलेला आहे?

**बर्नड डिमेलो :-**

ठराव कायदयानुसार झालेला आहे. कायदयाच्या कचाटयात येत असेल तर त्याच्यावर अधिकारी बघतील ते आपण जे भाड वाढ मागणी केलेली आहे. त्या हिशोबाने .........

**शरद पाटील :-**

साहेब, अधिकारी नाही जात आपण पास करुन देतो.

**मा. सभापती :-**

तुमची काही सुचना असेल तर ती दया.

**शरद पाटील :-**

सुचना नाही. आम्हाला फक्त एकच स्पष्टीकरण दया. जागा देण्याचा अधिकार स्थायी समितीला आहे का?

**बर्नड डिमेलो :-**

उत्तर दिलेले आहे.

**शरद पाटील :-**

उत्तर नाही दिलेले आहे. त्यांनी त्यांचा नियम वाचून दाखववा की अधिकार आहे म्हणुन मग विषय संपला.

**बर्नड डिमेलो :-**

लिहून दिलेल आहे. तुम्ही पुस्तकामध्ये बघा.

**मा. सभापती :-**

पाटील साहेब, बारकुंड साहेबांनी सांगितलेल आहे. ठराव मंजुर करण्यात येत आहे. पुढचा विषय घ्या.

**शरद पाटील :-**

माझा ह्याला विरोध आहे.

**प्रकरण क्र. ०३ :-**

महानगर गॅस लिमिटेड यांना सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षणातील जागा भाड्याने देणे बाबत.

**ठराव क्र. ०३ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत सर्व भागात महानगर गॅस लिमिटड मार्फत गॅस लाईन टाकण्याचे काम सुरु असून त्यांनी खालील दोन ठिकाणी ५.०० मीटर x ४.०० मीटर साईजची जागा डी.आर.एस बसविण्यासाठी भाडयाने मागितलेली आहे.

१) भाईंदर (पूर्व) टाऊन पार्क मागे आरक्षण क्र. २५९ (आरक्षणाच्या एका कॉर्नरला)

२) भाईंदर (प.) आरक्षण क्र.१०० (रेल्वे जवळील आरक्षणाच्या कॉर्नरला)

वरील दोन ठिकाणी २०.०० चौ.मीटर जागेचे अनुक्रमे रु. १७,२७०/- व रु. २०,०२०/- एवढे वार्षिक भाडे चालु बाजार भावानुसार (रेडी रेकनर नुसार) होत आहे. सदर भाडे भरण्यास महानगर गॅस लिमिटेड तयार आहेत.

तरी सदर दोन जागा तीन वर्ष मुदतीसाठी करारनामा करुन महानगर गॅस लिमिटेड यांना वरील प्रमाणे भाडे घेऊन देण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ नूसार मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४, भाईंदर (प.) येथे रेल्वे स्टेशन जवळ, स्कायवॉक खाली दुचाकी वाहनांचे वाहनतळ ठेका पध्दतीने चालविणेच्या कामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत.

**शरद पाटील :-**

माझा या विषयाला विरोध आहे. आम्ही जे सांगितलेल आहे. महानगर गॅसला आमचा कुठलाही विरोध नाही. जे रिझर्व्हेशन शाळेसाठी आहे. त्या रिझर्व्हेशनमध्ये परवानगी देता येत असेल. कायदेशीररित्या तर या परवानगीला आमचा विरोध नाही. जर कायदेशीररित्या, टेक्नीकलीरित्या कुठेही अडचणीचा असेल तर त्या गोष्टीला आमचा विरोध आहे. महानगरच्या कुठल्याही कामासाठी आमचा विरोध नाही. हे तुम्ही रेकॉर्डींग करुन घ्या आणि नोंद घ्या.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४ वाचलेले आहे.

**बर्नड डिमेलो :-**

भाईंदर पश्चिम येथे रेल्वे स्टेशन जवळ स्काय वॉक खाली दुचाकी वाहनांचे वाहनतळ ठेका पध्दतीने चालविणे कामी निविदा दि. १०/०९/२०११ रोजी काढण्यात आल्या होत्या. तसेच दि. २०/१२/२०१२ रोजी २३ ठिकाणी नवीन पे ॲन्ड पार्क (वाहनतळ) उभारण्याची निविदा ही माध्यमातून प्रसिध्द करण्यात आली होती. हा निर्णय महापालिका प्रशसनाने दि. १०/०४/२००८, प्र.क्र. ०३ ठराव क्र. ०३ अन्वये मा. आयुक्तांना प्राधिकृत केलेल्या अधिकाराच्या अधिन राहून कार्यान्वित केले. मात्र सदरच्या ठरावाला ४ वर्षाहून अधिक कालावधी झालेला आहे.

शहराची लोकसंख्या वेगाने वाढत आहे व त्याच बरोबर वाहनांची संख्या व त्यांची रहदारीच्या अडीअडचणीही वाढलेल्या आहेत. तथापी संपूर्ण शहराचा आढवा घेऊन रहिवासी क्षेत्रात जेथे महापालिकेची मोकळी जागा उपलब्ध असेल अशाच ठिकाणांना वाहनतळ प्रस्थापित करावे. तसेच निविदेमधील अनुभवाची अट काढावी व सदरचा विषय धोरणात्मक निर्णय घेण्याकरीता मा. महासभेमध्ये मंजूरीकरीता आणावा. दि. २०/०२/२०१२ रोजी मनपा क्षेत्रात २३ ठिकाणी नवीन वाहनतळांची प्रसिध्दी केलेली निविदा रद्द करावी व मा. महासभेमध्ये सविस्तर चर्चा करुन तद्नंतर फेर निविदा काढावी, असा ठराव मांडत आहे.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०४ :-**

भाईंदर (प.) येथे रेल्वे स्टेशन जवळ, स्कायवॉक खाली दुचाकी वाहनांचे वाहनतळ ठेका पध्दतीने चालविणेच्या कामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ०४ :-**

भाईंदर पश्चिम येथे रेल्वे स्टेशन जवळ स्काय वॉक खाली दुचाकी वाहनांचे वाहनतळ ठेका पध्दतीने चालविणे कामी निविदा दि. १०/०९/२०११ रोजी काढण्यात आल्या होत्या. तसेच दि. २०/१२/२०१२ रोजी २३ ठिकाणी नवीन पे ॲन्ड पार्क (वाहनतळ) उभारण्याची निविदा ही माध्यमातून प्रसिध्द करण्यात आली होती. हा निर्णय महापालिका प्रशसनाने दि. १०/०४/२००८, प्र.क्र. ०३ ठराव क्र. ०३ अन्वये मा. आयुक्तांना प्राधिकृत केलेल्या अधिकाराच्या अधिन राहून कार्यान्वित केले. मात्र सदरच्या ठरावाला ४ वर्षाहून अधिक कालावधी झालेला आहे.

शहराची लोकसंख्या वेगाने वाढत आहे व त्याच बरोबर वाहनांची संख्या व त्यांची रहदारीच्या अडीअडचणीही वाढलेल्या आहेत. तथापी संपूर्ण शहराचा आढवा घेऊन रहिवासी क्षेत्रात जेथे महापालिकेची मोकळी जागा उपलब्ध असेल अशाच ठिकाणांना वाहनतळ प्रस्थापित करावे. तसेच निविदेमधील अनुभवाची अट काढावी व सदरचा विषय धोरणात्मक निर्णय घेण्याकरीता मा. महासभेमध्ये मंजूरीकरीता आणावा. दि. २०/०२/२०१२ रोजी मनपा क्षेत्रात २३ ठिकाणी नवीन वाहनतळांची प्रसिध्दी केलेली निविदा रद्द करावी व मा. महासभेमध्ये सविस्तर चर्चा करुन तद्नंतर फेर निविदा काढावी, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी नविन स्ट्रीट लाईट पोल बसविणे प्रस्तावाना मान्यता देणे.

**रोहिदास पाटील :-**

याच्यामध्ये सगळेच प्रस्ताव तुमचे आलेले आहेत. इथे काम झाली, व्हायची आहेत. मी दोन सुचना देतो. एक तलाव रोड आहे. त्या तलाव रोड कन्स्ट्रक्शन आपण मंजुर केलेल आहे. पण ते ह्याच्यात आलेल नाही. बाजार गल्ली पूर्वेला पंचरत्न बिल्डींग आहे. ते ह्याच्यात आलेल नाही ती नोंद करावी. अशी माझी विनंती आहे.

**शरद पाटील :-**

आम्ही पण दुसऱ्या ह्याच्यात सुचना ॲड करतो. ह्या ॲड करुन स्ट्रीट लाईटसाठी आपला ठराव करा आपण म्हणता.

१) न्यु गोल्डन नेस्ट फेस ७, ८, ९, १० येथे.
२) हाटकेश रस्त्यांवर, सिध्दीविनायक ते पुनम सरगम पर्यंत.
३) कमिश्नर बंगलो ते जांगीड सर्कल पर्यंत.
४) सेवेन स्क्वेअर ॲकेडमी स्कुल ते रामदेव पार्क पर्यंत.
५) गौरव व्हॅली ते एन. जी. पॅराडाईस पर्यंत.
६) गौरव सिटी ते येवर साईन वुड पर्यंत.
७) कमफर्ट हॉटेल ते रामदेव पार्क जाणारा रस्ता.
८) Express Inn Hotel ते वरसावे गाव रोड जाणारा रोड.
९) आयडीयल पार्क ते इन्द्रलोक कडे जाणारा रस्ता.
१०) दिपक हॉस्पीटल लेन पी.के. रोड येथे जय पुनम नगर बिल्डींगपासून आयडीयल पार्क पर्यंत रस्त्याच्या डाव्या बाजूकडे.
११) आयडीयल पार्क ते सलोम बिल्डींग ते रामदेव पार्क पर्यंत
१२) लक्ष्मी पार्क ते R.B.K. कॉलेज कडे जाणारा रस्ता.
१३) मेडतीया पार्कमध्ये जाणाऱ्या रस्त्यावर.
१४) कनकिया येथील ईडेन रोझ कॉम्प्लेक्स मधील रश्मी हेतल बिल्डींग जी.एच. पासून झेड पर्यंत.

१५)कमलापार्क, इंदिरा कॉम्प्लेक्स सोसायटी गल्ली, ६० फुट रोड, भाईंदर (प.) या स्ट्रीट लाईट अंतर्गत जोडून घ्यावे. अशी मी सुचना मांडत आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मेरी भी सुचना है। कमला पार्क, भाईंदर वेस्ट और इंद्रप्रस्थ में सोसायटी गल्ली जैन बावन जिनालयके लाने के पिछे स्ट्रीट लाईट पे कन्वरशन करनेकी जरुरत है।

**संदिप पाटील :-**

माझी पण एक सुचना आहे. राई स्मशानापासुन ते राई ऑफिसपर्यंत स्ट्रीट लाईटसाठी मी पत्र दिल होते. पण, या पत्राचा उल्लेख या ठरावामध्ये घेतलेला नाही. आता जी पत्र तुम्हाला आलेली आहे स्ट्रीट लाईट पास करण्याची ती नगरसेवकांनी पत्र देऊन आलेली आहे की, प्रशासनाने दिली आहे. याचा जरा प्रशासनाने खुलासा करावा.

**शिवाजी बारकुंड :-**

हे जे प्रस्ताव आलेले आहेत. काही लोकप्रतिनिधीने पण पत्र दिलेले आहे आणि प्रशासनाकडुन पण आलेले आहे. आज जे सुचवलेल आहे स्टँडिंग कमिटी प्रत्येक आठवड्याला होते. अल्टरनेट जर उद्या पत्र आली तर ती पुढच्या आठवडयामध्ये येईल प्रस्ताव.

**संदिप पाटील :-**

बारकुंड साहेब दि. ९/११/१२ रोजी मी स्ट्रीट लाईटच पत्र दिल होत. नविन स्ट्रीट लाईच पण या ठरावामध्ये आलेल नाही. तुम्ही बोलता लोकप्रतिनिधींने दिलेले घेतलेल आहे. आमच पत्र आलेल नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

आपला मुळ प्रश्न होता. तुम्ही हे दिलेल आहे. हे कोणी मागणी केलेली आहे प्रशासनाने केली आहे की नगरसेवकांनी. तर ह्याच्यात लोकप्रतिनिधी आणि प्रशासन. दोघांनीही केलेली आहे आणि अजुनही काही राहिलेले असतील तर पुढच्या स्टँडिंग सभेपुढे घेवून येऊ.

**प्रशांत दळवी :-**

एक महिन्यापुर्वी दिलेल होते तर का घेण्यात आले नाही. आता घ्यावे लागेल. ते पण नमुद करुन घ्या. आणि ठराव मंजुर करुन घ्या.

**हेलन गोविंद :-**

सदर ठरावामध्ये माझ्या सुचना आहेत.

१) प्रभाग क्र. २५ मध्ये धावगी, चौक, पाली, दत्तमंदिर, पाल खाडी व इतर ठिकाणी
२) प्रभाग क्र. ४० मध्ये चिमाजीनगर, राजीव गांधीनगर, शविशक्ती नगर व इतर
३) प्रभाग क्र. १ मध्ये गणेश देवल नगर ते नितीन चाळ शौचालय, शिमला गल्ली ते आनंद नगर शौचालय ते महानगरपालिका बालवाडी पर्यंतच्या रस्त्यावर.
४) प्रभाग क्र. २३, शास्त्री नं. मध्ये १५ पोल नेहरु नगरमध्ये १५ पोल.
५) प्रभाग क्र. ४१ मध्ये ओमशांती चौक (बालाजी हॉटेलसमोर) हायमास्ट, अंबर प्लाझासमोर हायमास्ट, रॉयल पार्क हायमास्ट, मीरा धाम जवळ लाईटचे पोल, हायसन पार्क - नित्यानंद नगर येथे लाईटचे पोल, म्हाडा वसाहत येथे लाईटचे पोल.
६) प्रभाग क्र. १५ करिता देखील स्ट्रीट लाईटची व्यवस्था करावी.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

सर, इसमे बडा महत्वपूर्ण विषय है। लोकप्रतिनिधी से पत्र आ गए। वह आपने लिए। जो नही आये, वह आगे ले लेंगे। इसे डिपार्टमेंट मे कार्यपध्दती पे प्रश्नचिन्ह खडा होता है। जो स्थायी समिती के सदस्य ने सुचना मांड दी। लेकिन बाकी सदस्य नही है। उनका भी नही हुआ होगा तो वह सुचना कब डालेंगे। इसिलिए डिपार्टमेंट को ताकिद की जाए की, जिनका पत्र आगया उसका डेड लाईन १५-२० निश्चित की दी जाए। या तो उसका जवाब दिया जाए की उनका मनपा किया है। ऐसा स्पष्ट उत्तर दिया जाए। पेंडींग रखनेसे आप डिपार्टमेंट को शह दे रहे है। डिपार्टमेंट मे कार्यपध्दती स्पष्ट रहनी चाहिए।

**प्रविण पाटील :-**

मा. सभापती साहेब, मला या विषयावर बोलायच आहे. एक नंबर म्हणजे आमच्या विभागामध्ये निवडणुकीच्या अगोदर काही पोल लावण्यात आले. तर इंजिनियरिंग प्लानिंगनुसार काहीतरी ठराविक अंतर असत त्यांच.

**बर्नड डिमेलो :-**

सुचना मांडा.

**प्रविण पाटील :-**

सुचना नाही. विषयाशी संबंधीत आहे. स्टँडिंग कमिटीचा विषय आहे.

**बर्नड डिमेलो :-**

मा. महासभेमध्ये आपण करु.

**प्रविण पाटील :-**

मा. महासभेत नाही, स्टँडिंग कमिटीमध्ये विषय आहे. तर संबंधित अधिकारी काकडे आहेत. त्यांना दाखवून जवळ-जवळ २० फुटाच्या अंतरावर पोल लावला. आणि निवडणुक झाल्यानंतर तो पोल काढण्यात आला. तर मला विचारायच आहे की, तो पोल निवडणुकीच्या अगोदर लावला तो कोणाच्या सुचनेनुसार लावला आणि कोणाच्या सुचनेनुसार काढण्यात आला. मला त्याचा स्पष्टीकरण संबंधित अधिका-याने खुलासा करुन दयावा. मी तस पत्र ही दिलेल आहे. त्याबाबत फोटो ही दाखवण्यात आलेला आहे. असे तुम्ही जर संबंधित म्हणजे तिकडचे नगरसेवक पुढारी असतील. निवडणुकीच्या अगोदर सोयीनुसार बनवत असाल तर हे योग्य नाही. आणि ह्याचा खुलासा मला या मिटींगमध्ये पाहिजे. आणि त्याचा विषय आहे. विषय क्र. ३७ मध्ये ४ पोल लावण्यात आलेले आहे. आणि ४ पोल कोणाच्या सांगण्यावरुन लावण्यात आलेले आहे. साहेब माझी सुचना आहे. विषय क्र. ३१ मध्ये ४ पोल आहे. तर तिथे पोलची संख्या १० करण्यात यावी.

**बर्नड डिमेलो :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी नविन स्ट्रीट लाईट पोल बसविणे कामी मे. रिलायन्स एनर्जी लि. कंपनीच्या अधिका-यांसमवेत प्रत्यक्ष जागेवर पहाणी करण्यात आलेली असून त्यानुसार खालील नमूद ठिकाणी स्ट्रीट लाईट पोल बसविणे कामी मे. रिलायन्स एनर्जी लि. कंपनीला कळविण्यात आलेले आहे. सदर ठिकाणाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | पोल संख्या |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पूर्व) शिवशक्ती नगर | ०३ |
| २ | भाईंदर (प.) स्टेशन रोड, सुदामा नगर, शास्त्री नगर, नाझरेथ चर्च | ०५ |
| ३ | मॅक्सस मॉल जंक्शन, मोहम्मदी चौक, आंबेडकर नगर जंक्शन | ०२ |
| ४ | मिरारोड (पूर्व) नयानगर व सेक्टर नं.०९ | ०३ |
| ५ | घोडबंदर बस स्टॉप येथील स्मशानभुमी | ०८ |
| ६ | मिरारोड (पूर्व) सुदरनगर व रामदेव पार्क | ०५ |
| ७ | मिरारोड (पूर्व) मेरीगोल्ड ०१, एम आय जी कॉम्प., रितु अपार्टमेंन्ट | १५ |
| ८ | मिरारोड (पूर्व) पुजापार्क जवळील विनयनगर | ११ |
| ९ | मिरारोड (पूर्व) मेरीगोल्ड महापौर बंगल्याजवळील स्ट्रीट लाईट कन्वर्जन | ४८ |
| १० | रामदेव पार्क रोडवरील स्ट्रीट लाईट कन्वर्जन | ३४ |
| ११ | क्वीन्स पार्क जंक्शन ते मयुर अपार्टमेंट | ०३ |
| १२ | मिरारोड (पूर्व) रिगल आर्केड ते ओमसाई अपार्टमेंट, पुनमसागर कॉम्प. | ०३ |
| १३ | मिरारोड (पूर्व) वागड नगर जंक्शन (लिबर्टी कॉर्नर ) ते देवशांती | ०३ |
| १४ | न्यु गोल्डन नेस्ट, सोनम अभिनव | १२ |
| १५ | मिरारोड (पूर्व) मंगल नगर रोड ते गंगा सदन बिल्डींग | २१ |
| १६ | काशिमिरा रोडवरील संघवी नगर येथील स्ट्रीट लाईट पोल चे कन्वर्जन | ०६ |
| १७ | भाईंदर (पूर्व) जैसलपार्क कोळी नगर ते पवन पॅलेस | ०४ |
| १८ | उत्तन पालीबंदर जेटी | ०१ |
| १९ | मिरारोड (पूर्व) जांगीड इस्टेट, साईसृष्टी इमारत | ०५ |
| २० | भाईंदर (पूर्व) बंदरवाडी येथे | ०१ |
| २१ | भाईंदर (पूर्व) भाईदया नगर येथील स्ट्रीट लाईट पोल चे कन्वर्जन | ०५ |
| २२ | भाईंदर (प.) येथील गीतानगर परीसरातील स्ट्रीट लाईट पोलला अधिक ब्रॅकेट लावणे | ०६ |
| २३ | भाईंदर (प.) सुदामा नगर, इंद्र कॉम्प. परीसरातील स्ट्रीट लाईट पोल चे कन्वर्जन करणे | १८ |
| २४ | शांतीपार्क बालाजी ग्रँड हॉटेल ते एच डी एफ सी बँक | २८ |
| २५ | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर ०६ | १२ |
| २६ | मिरारोड (पूर्व) पुनमनगर फेस नं ०३ खेळाचे मैदान | ०६ |
| २७ | मिरारोड (पूर्व) से-०५ खेळाचे मैदान | ०३ |
| २८ | भाईंदर (प.) विनायक नगर स्ट्रीट लाईट पोलचे कन्वर्जन | ५२ |
| २९ | मिरारोड (पूर्व) शांतीविहार | ०६ |
| ३० | मिरारोड (पूर्व) उमराव हॉस्पीटल जवळ | १० |
| ३१ | भाईंदर (पूर्व) नवघर गांव, मधूकर पाटील चाळ, गांवदेवी चाळ | ०४ |
| ३२ | कनकिया रोड मा.आयुक्त निवास जवळ | ०६ |
| ३३ | मिरारोड (पूर्व) लवलेश एन्क्लेव्ह रोड | ०७ |
| ३४ | इंद्रलोक न.०४ कृष्ण वाटीका | ०४ |
| ३५ | मिरारोड (पूर्व) दिपक हॉस्पीटल रोड, सेवन स्क्वेअर ॲकॅडमी, केनवूड पार्क रोड | १४ |
| ३६ | नवघर रोड काशीबाई इस्टेट, संदिप किरण इस्टेट | ०६ |

| | | |
|---|---|---|
| ३७ | मिरारोड (पूर्व) हटकेश रोड पुनम सरगम | ०७ |
| ३८ | मिरारोड (पूर्व) नयानगर सेच्युंरी पार्क | ०३ |
| ३९ | भाईंदर (प.) चंदुलाल पार्क | ०७ |
| ४० | भाईंदर (पूर्व) स्टेशन रोड | ०२ |
| ४१ | भाईंदर (प.) क्रॉस गार्डन, लकी अपार्टमेंट | ०१ |
| ४२ | मिरारोड (पूर्व) नयानगर ॲक्सीस अपार्टमेंट एन जी व्हियु अपार्टमेंट | ०१ |
| ४३ | भाईदर (पूर्व) आर एन पी पार्क रोड | ०२ |
| ४४ | भाईंदर (पूर्व) आझाद नगर | ०३ |
| ४५ | मिरारोड (पुर्व) पुनम गार्डन | १७ |
| ४६ | मिरारोड (पूर्व) नयानगर ॲक्सीस अपार्टमेंट एन जी व्हियु अपार्टमेंट | ०३ |
| ४७ | मिरारोड (पुर्व) काशिगांव मिनाक्षीनगर | ०३ |
| ४८ | भाईंदर (पूर्व) इंद्रलोक देवसुष्टी बिल्डींग जवळ | ०५ |
| ४९ | मिरारोड (पुर्व) काशिगांव मिनाक्षीनगर | ०५ |
| ५० | भाईंदर (प.) उत्तन परशुराम वाडी | ०९ |
| ५१ | भाईंदर (पूर्व) सरस्वती सदन | ०४ |
| ५२ | मिरारोड (पूर्व) कनकिया रोड लक्ष्मी वैभव बिल्डींग जवळ | ०६ |
| ५३ | भाईंदर (पूर्व) जैसलपार्क येथील माधव पार्क | ०३ |
| ५४ | भाईंदर (प.) विनायकनगर येथील महाराणा प्रताप गार्डन | ०४ |

वरील प्रमाणे नविन स्ट्रीट लाईट पोल बसविणे कामी प्रस्तावाना मान्यता देण्यात येत आहे.

**संदिप पाटील :-**

आम्ही ज्या सुचना दिलेल्या आहेत ते त्या तुम्ही नमुद केल्या आहेत का?

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय, प्रामुख्याने हे जे काही पोल बसविण्यात येतात. त्यात प्रशासनाचे आणि लोकप्रतिनिधीच त्यांच्या शिफारसी घेतल्या जातात. पुढच्या वेळेला अस करत असताना पाहिला लोकप्रतिनिधीच्या शिफारसींना मान्यता दया. कारण एक-एक महिना झाला, त्या शिफारसींच्या मान्यता त्याच्यामध्ये आलेल्या नाही. पुढे प्रशासनाचे पण घ्या परंतु, लोकप्रतिनिधीच पहिल्यांदा घ्या, एवढी माझी विनंती आहे.

**मा. सभापती :-**

सर्व विभाग प्रमुखांना नोंद घ्यायला सांगणार.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, एक सुचना आहे. संख्या जी आहे ना थोडीशी कुठेतरी चूक आहे. विनायक नगर स्ट्रीट लाईट पोलच कन्वरशन ५२-५२ पोल म्हणजे कुठपासुन कुठपर्यंत.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

यह कन्वरशन का मतलब क्या है? यह अधिकारी से स्पष्टीकरण करवायेंगे।

**प्रमोद सामंत :-**

हाय कॅपिसिटी बल्ब लगाने का।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

उसमें कन्वरशन छोटे पोल को बडे पोल बनाना भी आता है और छोटे पॅकेट को बडा पॅकेट भी करना आता है। उसका रेट तो अलग-अलग लगेगा। तो आपने कन्वरशन स्पष्ट क्यों नही किया है? कन्वरशन क्या करना है? ब्रॅकेट में चेंज करने को बोला है।

**शिवाजी बारकुंड :-**

आपका इसमें कन्वरशन लगता है, तो आगेसे इसमे क्लिअर कट लिखेंगे। उसमें पोल बडा करनेका है, कौनसा करने का है?

**मा. सभापती :-**

सुचनेसह ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी नविन स्ट्रीट लाईट पोल बसविणे प्रस्तावाना मान्यता देणे.

**ठराव क्र. ०५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी नविन स्ट्रीट लाईट पोल बसविणे कामी मे. रिलायन्स एनर्जी लि. कंपनीच्या अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष जागेवर पहाणी करण्यात आलेली असून त्यानुसार खालील नमूद ठिकाणी स्ट्रीट लाईट पोल बसविणे कामी मे. रिलायन्स एनर्जी लि. कंपनीला कळविण्यात आलेले आहे. सदर ठिकाणाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | पोल संख्या |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पूर्व) शिवशक्ती नगर | ०३ |
| २ | भाईंदर (प.) स्टेशन रोड, सुदामा नगर, शास्त्री नगर, नाझरेथ चर्च | ०५ |
| ३ | मॅक्सस मॉल जंक्शन, मोहम्मदी चौक, आंबेडकर नगर जंक्शन | ०२ |
| ४ | मिरारोड (पूर्व) नयानगर व सेक्टर नं.०९ | ०३ |
| ५ | घोडबंदर बस स्टॉप येथील स्मशानभुमी | ०८ |
| ६ | मिरारोड (पूर्व) सुदरनगर व रामदेव पार्क | ०५ |
| ७ | मिरारोड (पूर्व) मेरीगोल्ड ०१, एम आय जी कॉम्प., रितु अपार्टमेंन्ट | १५ |
| ८ | मिरारोड (पूर्व) पुजापार्क जवळील विनयनगर | ११ |
| ९ | मिरारोड (पूर्व) मेरीगोल्ड महापौर बंगल्याजवळील स्ट्रीट लाईट कन्वर्जन | ४८ |
| १० | रामदेव पार्क रोडवरील स्ट्रीट लाईट कन्वर्जन | ३४ |
| ११ | क्वीन्स पार्क जंक्शन ते मयुर अपार्टमेंट | ०३ |
| १२ | मिरारोड (पूर्व) रिगल आर्केड ते ओमसाई अपार्टमेंट, पुनमसागर कॉम्प. | ०३ |
| १३ | मिरारोड (पूर्व) वागड नगर जंक्शन (लिबर्टी कॉर्नर ) ते देवशांती | ०३ |
| १४ | न्यु गोल्डन नेस्ट, सोनम अभिनव | १२ |
| १५ | मिरारोड (पूर्व) मंगल नगर रोड ते गंगा सदन बिल्डींग | २१ |
| १६ | काशिमिरा रोडवरील संघवी नगर येथील स्ट्रीट लाईट पोल चे कन्वर्जन | ०६ |
| १७ | भाईंदर (पूर्व) जैसलपार्क कोळी नगर ते पवन पॅलेस | ०४ |
| १८ | उत्तन पालीबंदर जेटी | ०१ |
| १९ | मिरारोड (पूर्व) जांगीड इस्टेट, साईसृष्टी इमारत | ०५ |
| २० | भाईंदर (पूर्व) बंदरवाडी येथे | ०१ |
| २१ | भाईंदर (पूर्व) भाईदया नगर येथील स्ट्रीट लाईट पोल चे कन्वर्जन | ०५ |
| २२ | भाईंदर (प.) येथील गीतानगर परीसरातील स्ट्रीट लाईट पोलला अधिक ब्रॅकेट लावणे | ०६ |
| २३ | भाईंदर (प.) सुदामा नगर, इंद्र कॉम्प. परीसरातील स्ट्रीट लाईट पोल चे कन्वर्जन करणे | १८ |
| २४ | शांतीपार्क बालाजी ग्रॅंड हॉटेल ते एच डी एफ सी बॅंक | २८ |
| २५ | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर ०६ | १२ |
| २६ | मिरारोड (पूर्व) पुनमनगर फेस नं ०३ खेळाचे मैदान | ०६ |
| २७ | मिरारोड (पूर्व) से-०५ खेळाचे मैदान | ०३ |
| २८ | भाईंदर (प.) विनायक नगर स्ट्रीट लाईट पोलचे कन्वर्जन | ५२ |
| २९ | मिरारोड (पूर्व) शांतीविहार | ०६ |
| ३० | मिरारोड (पूर्व) उमराव हॉस्पीटल जवळ | १० |
| ३१ | भाईंदर (पूर्व) नवघर गांव, मधूकर पाटील चाळ, गांवदेवी चाळ | ०४ |
| ३२ | कनकिया रोड मा.आयुक्त निवास जवळ | ०६ |
| ३३ | मिरारोड (पूर्व) लवलेश एन्क्लेव्ह रोड | ०७ |
| ३४ | इंद्रलोक न.०४ कृष्ण वाटीका | ०४ |
| ३५ | मिरारोड (पूर्व) दिपक हॉस्पीटल रोड, सेवन स्क्वेअर अॅकॅडमी, केनवूड पार्क रोड | १४ |
| ३६ | नवघर रोड काशीबाई इस्टेट, संदिप किरण इस्टेट | ०६ |
| ३७ | मिरारोड (पूर्व) हटकेश रोड पुनम सरगम | ०७ |
| ३८ | मिरारोड (पूर्व) नयानगर सेच्युंरी पार्क | ०३ |
| ३९ | भाईंदर (प.) चंदुलाल पार्क | ०७ |
| ४० | भाईंदर (पूर्व) स्टेशन रोड | ०२ |
| ४१ | भाईंदर (प.) क्रॉस गार्डन, लकी अपार्टमेंट | ०१ |
| ४२ | मिरारोड (पूर्व) नयानगर अॅक्सीस अपार्टमेंट एन जी व्हियु अपार्टमेंट | ०१ |
| ४३ | भाईंदर (पूर्व) आर एन पी पार्क रोड | ०२ |
| ४४ | भाईंदर (पूर्व) आझाद नगर | ०३ |
| ४५ | मिरारोड (पुर्व) पुनम गार्डन | १७ |
| ४६ | मिरारोड (पूर्व) नयानगर अॅक्सीस अपार्टमेंट एन जी व्हियु अपार्टमेंट | ०३ |
| ४७ | मिरारोड (पुर्व) काशिगांव मिनाक्षीनगर | ०३ |
| ४८ | भाईंदर (पूर्व) इंद्रलोक देवसुष्टी बिल्डींग जवळ | ०५ |
| ४९ | मिरारोड (पुर्व) काशिगांव मिनाक्षीनगर | ०५ |
| ५० | भाईंदर (प.) उत्तन परशुराम वाडी | ०९ |

| | | |
|---|---|---|
| ५१ | भाईंदर (पूर्व) सरस्वती सदन | ०४ |
| ५२ | मिरारोड (पूर्व) कनकिया रोड लक्ष्मी वैभव बिल्डींग जवळ | ०६ |
| ५३ | भाईंदर (पूर्व) जैसलपार्क येथील माधव पार्क | ०३ |
| ५४ | भाईंदर (प.) विनायकनगर येथील महाराणा प्रताप गार्डन | ०४ |

वरील प्रमाणे नविन स्ट्रीट लाईट पोल बसविणे कामी प्रस्तावाना मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**सदर ठरावामध्ये सुचक श्रीम. हेलन गोविंद अनुमोदक श्रीम. शर्मिला बगाजी ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

७) प्रभाग क्र. २५ मध्ये धावगी, चौक, पाली, दत्तमंदिर, पाल खाडी व इतर ठिकाणी
८) प्रभाग क्र. ४० मध्ये चिमाजीनगर, राजीव गांधीनगर, शविशक्ती नगर व इतर
९) प्रभाग क्र. १ मध्ये गणेश देवल नगर ते नितीन चाळ शौचालय, शिमला गल्ली ते आनंद नगर शौचालय ते महानगरपालिका बालवाडी पर्यंतच्या रस्त्यावर.
१०) प्रभाग क्र. २३, शास्त्री नं. मध्ये १५ पोल नेहरु नगरमध्ये १५ पोल.
११) प्रभाग क्र. ४१ मध्ये ओमशांती चौक (बालाजी हॉटेलसमोर) हायमास्ट, अंबर प्लाझासमोर हायमास्ट, रॉयल पार्क हायमास्ट, मीरा धाम जवळ लाईटचे पोल, हायसन पार्क - नित्यानंद नगर येथे लाईटचे पोल, म्हाडा वसाहत येथे लाईटचे पोल.
१२) प्रभाग क्र. १५ करिता देखील स्ट्रीट लाईटची व्यवस्था करावी.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. प्रमोद सामंत, अनुमोदक श्री. राजेश वेतोसकर ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

मिरारोड येथील खालील ठिकाणी नवीन स्ट्रीट पोल बसविण्याकरीता सुचना मांडत आहे.

१) सेक्टर क्र.६ शांतीनगर, विश्वेश्वर शांती हिंदू मंदिर समोरील मैदानात आवश्यक स्ट्रीट लाईट पोल बसविण्यात यावेत.
२) रेल्वे समांतर रस्ता स्मशान रोड वरील स्ट्रीट लाईट पोलची क्षमता (कनव्हर्जन) वाढवून आवश्यकतेनुसार नवीन पोल बसविण्यांत यावेत.
३) अस्मिता कॉसमॉस इमारतीजवळ स्ट्रीट लाईट पोल बसविण्यांत यावा.
४) साई सृष्टी कॉम्प्लेक्सकडील रस्त्यावर आवश्यकतेनुसार स्ट्रीट लाईट पोल बसविण्यात यावा.
५) उत्तन मोठा गाव, अलिबाग, देवतलाव, भाटेबंदर आवश्यकतेनुसार पोल बसविणे.
६) शिया कब्रस्तानमध्ये पोल लावणे.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. शरद पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

१) न्यु गोल्डन नेस्ट फेस ७, ८, ९, १० येथे.
२) हाटकेश रस्त्यांवर, सिध्दीविनायक ते पुनम सरगम पर्यंत.
३) कमिश्नर बंगलो ते जांगीड सर्कल पर्यंत.
४) सेवेन स्क्वेअर ॲकेडमी स्कुल ते रामदेव पार्क पर्यंत.
५) गौरव वॅली ते एन. जी. पॅराडाईस पर्यंत.
६) गौरव सिटी ते येवर साईन वुड पर्यंत.
७) कमफर्ट हॉटेल ते रामदेव पार्क जाणारा रस्ता.
८) Express Inn Hotel ते वरसावे गाव रोड जाणारा रोड.
९) आयडीयल पार्क ते इन्द्रलोक कडे जाणारा रस्ता.
१०) दिपक हॉस्पीटल लेन पी.के. रोड येथे जय पुनम नगर बिल्डींगपासून आयडीयल पार्क पर्यंत रस्त्याच्या डाव्या बाजूकडे.
११) आयडीयल पार्क ते सलोम बिल्डींग ते रामदेव पार्क पर्यंत
१२) लक्ष्मी पार्क ते R.B.K. कॉलेज कडे जाणारा रस्ता.
१३) मेडतीया पार्कमध्ये जाणाऱ्या रस्त्यावर.
१४) कनकिया येथील ईडेन रोझ कॉम्प्लेक्स मधील रश्मी हेतल बिल्डींग जी.एच. पासून झेड पर्यंत.
१५) कमलापार्क, इंदिरा कॉम्प्लेक्स सोसायटी गल्ली, ६० फुट रोड, भाईंदर (प.)

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

१) बी. पी. रोड ते नवघर रोड पंचभगिनी, प्रभाग कार्यालय, मयूर पंख रस्ता.
२) खारीगांव नाका, परब मसाला, साधुराम हॉटेल, पंचरत्न इमारत पर्यंत २५० वॅटचे दिवे लावणेबाबत.

**सुचनेसह ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६, लॉन्ड्री करीता मागविण्यात आलेल्या निविदेचे दर मंजूर करणेबाबत.

**बर्नड डिमेलो :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवा-यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मिरारोड येथील भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयाकरीता मागविण्यात आलेल्या लॉन्ड्री करीताच्या निविदेतील अनुक्रमांक १ मधील कॅप व मास्क या डिस्पोजेबल घेण्यात याव्यात व उर्वरीत बाबींकरीता मे. एस.आर. इंटरप्रायजेस या निविदाकाराने सादर केलेले दर स्विकारण्यास ही स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय, इस ठराव के पास होने से काफी नुकसान हो सकता है। इसमें ग्लोज, बॅग, मॉप्स, कॅप्स, क्लॉथस् इनका एक बार धोने का खर्चा आगया ९ रु. ९० पैसा। इसके बाद स्टाफ को वॉशिंग अलाउंस भी दिया जाता है। उसके अंदर का लेगीन्स और उनका युनिफॉर्म अपिरंस वह उनका पर्सनल रहता है। वह उनके वॉशिंग अलाउंस मे आना चाहिए। वह इसमे नही आना चाहिए। छोटे छोटे clothes लिखा है। इसके अंदर इसका धोने का रेट २४ रु. ९९ पैसे यानी २५ रु. १ टेबल को धोने का? वह एक छोटेसे वॉशिंग मशिन में धोके भी मेंटन मे रख सकते है। इसमे कई प्रस्ताव हमने पास किए है, जिसका मिस युज हो सकता है। इसलिए जो नॉर्मल पडता है, जो डिपॉझिट मे सस्ता पडता है, वह डिपॉझिट लिया जाए। जो पर्सनल स्टाफ के लेगीन्स, अनेरंस, सिस्टर के उनका खुदका अलाउंस मेन्टेन करके दिया जाए। और टेबल क्लॉथ छोटे-छोटे मॉप्स है। या यह शर्टपॅन्ट है, स्टाफ के वह वॉशिंग मशिन में धोया जाए। उनको प्रेस की जरुरत नही है। जरुरत उन चिजों की है ब्लँकेट है उनको ड्राय क्लीन की जरुरत है। वह रखा जाए। उसमें स्पष्ट लिखा जाए। ब्लँकेट को आप कब-कब धुलवायेंगे। पर कब करवायेंगे, चार दिन बाद करवायेंगे। ६ महिने मे करवाएगे वह जरुरी है। यह सब चिज में स्पष्टीकरण जरा भी नहीं है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानबीने बोलतो साहेब हे करारनाम्यामध्ये सगळ येणार.

**शरद पाटील :-**

म्हणजे तुम्ही करारनामा कराल. तेव्हा आम्हाला दाखवणार. पहिला तुम्ही आमच्याकडुन परवानगी घेणार आणि मग तुमच्या मनाप्रमाणे तुम्ही करणार.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

पाटील साहेब, निविदा मंजुर आहेत. करारनाम्यात छोट्या-छोट्या गोष्टी असतात. ते करारनाम्यात येतात. रिटनमध्ये निविदेमध्ये करारनाम्याच्या अटीशर्ती येतात.

**बर्नड डिमेलो :-**

डॉ. साहब, आपको मालुम है कोई लॉन्ड्रीवाला मिला नहीं है। आप जो बोल रहे है २००रु. या ३०० रु. साल का खर्चा आता है। अगर ऐसा खर्चा बचाने के चक्कर में जाओगे तो ऐसा नहीं चलेगा।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

अक्षरशः माणुस मिळत नव्हता.

**राजेंद्र जैन :-**

पानपट्टे साहब, आपने बोला बिलकुल मंजुर है। लेकिन हकीकत यह है की, इस दर को कम्पेर करने के लिए मिरा भाईंदर नगरपालिका मे चल रहे चार हॉस्पीटल तुंगा, उमराव, या भगवती किसी का दर हमारे पास नहीं है, की हम खर्च कर सके। चलो एक बात है की, हमारे पास दर नही है। इसिलिए मंजुर कर रहे है। इतनी मिरा भाईंदर महानगरपालिका मजबुर है, इसके पहले कम्पेर तो करले। हमे मजबुरी मे देना पड रहा है। की हम जो दर दे रहे है, ज्यादा दे रहे है, मजबुरी मे दे रहे है। यह तो मालुम पडजाए जनता को की, नहीं आया किसीका टेंडर हम मजबुरी में दे रहे है।

**प्रमोद सामंत :-**

तीन बार रि-कॉल हुआ है।

**राजेंद्र जैन :-**

आपकी बात मान रहा हूँ। की, हमारे पास दर नहीं आया है। किसी का भी कॉल नहीं आया है। हम मानते है की, मजबुरी में ज्यादा दे रहे है। लेकिन कंपनी को मालुम पडे कितना दर दे रहे है। उमराव हॉस्पीटल है, तुंगा है, भगवती है। उसमे क्या रेट चल रहे है। यह तो कमसे कम आना चाहिए।

**प्रमोद सामंत :-**

मा. सभापती महोदय, हमारा जो टर्न ओवर है, हमारा जो काम है वह बहुत छोटा है। बहुत कम काम हमारे यहाँ निकलता है। इसिलिए हमारे यहाँ काम करने कोई लॉन्ड्रीवाला तैयार नहीं है। फिर भी तीन बार टेंडर आया है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

महानगरपालिका का पैसा नही, जनता के पैसे की बात है।

**बर्नड डिमेलो :-**

डॉ. साहब, आपको जितनी चिंता है, उससे डबल हमको चिंता है।

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर करण्यात येत आहे. तसेच पुढचा विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र ०६ :-**

लॉन्ड्री करीता मागविण्यात आलेल्या निविदेचे दर मंजूर करणेबाबत.

**ठराव क्र. ०६ :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मिरारोड येथील भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयाकरीता मागविण्यात आलेल्या लॉन्ड्री करीताच्या निविदेतील अनुक्रमांक १ मधील कॅप व मास्क या डिस्पोजेबल घेण्यात याव्यात व उर्वरीत बाबींकरीता मे. एस.आर. इंटरप्रायजेस या निविदाकाराने सादर केलेले दर स्विकारण्यास ही स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७, वार्षिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत. (सन २०११-२०१२)

**प्रमोद सामंत :-**

साहेब, या जमा खर्चाबाबत थोडी चर्चा करायची आहे. त्यामध्ये जमा बाजूमध्ये, करमध्ये ५२ करोड रु. वसुलीच लक्ष ठेवल होत. आपल्याकडे ३२ करोड रु. जमा झाले. १९ करोड रु. थकबाकी आहे. जो जमाखर्च दिला आहे त्याप्रमाणे या ५२ करोड रु. मध्ये मला संबंधित अधिकाऱ्याने उत्तर देण्याची अपेक्षा आहे. आपण जो नविन कर लागु केले. त्या वर्षात वर्ष २०११-१२ मध्ये त्याची कुठे नोंद घेतलेली आहे का? ते ॲड झालेले आहे का?

**दिपक सावंत :-**

आपण प्रत्येक वर्षी १०% वाढ करुनच बजेट बनवतो. तर ते १०% ॲड होवून आलेले आहे.

**प्रमोद सामंत :-**

म्हणजे १०% कर याच्यामध्ये नविन आला. ३ करोड रु. यामध्ये लागु झालेला आहे का ३२ करोड रु. मध्ये.....

**दिपक सावंत :-**

हो.

**प्रमोद सामंत :-**

अस आहे का? एक्जॅट मला पाहिजे. ३२ करोड मध्ये १०% तुम्ही इस्टीमेशन केल. पण, याच्यामध्ये नविन कर किती आहे?

**दिपक सावंत :-**

माहिती घेवून तुम्हाला सांगतो.

**प्रमोद सामंत :-**

ऑडिटर साहेबांकडे माहिती असेल ना.

**दिपक सावंत :-**

नविन वर्षाची त्यांच्याकडे नाही.

**प्रमोद सामंत :-**

आता २०११-१२ हे वर्ष संपल आहे. आता आपल्याला नविन बजेट तयार करायचा आहे. तर याची माहिती. साहेब अजुनपर्यंत ऑडिट रिपोर्ट आलेला नाही. माझ्यामते आतापर्यंत ऑडीटर साहेबांकडे माहिती असायला हवी.

**भागवत मुरकुटे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो साहेब अजुन पर्यंत आपल्याकडे माहिती आली नाही.

**प्रमोद सामंत :-**

कधीपर्यंत माहिती उपलब्ध होईल. कस आहे आता आपण जमा खर्च पास करणार. म्हणजे थोडक्यात स्टँडिंग कमिटी म्हणजे लोकांच्या म्हणण्याप्रमाणे ही तिजोरीची किल्ली. तिजोरिचा जमाखर्च आपण आज सॅक्शन

करणार. पण त्यामध्ये ज्या बारीक-बारीक गोष्टी आहे. त्याच्यामध्ये आपल आपल शहर चालवतो त्या गोष्टी आपण क्लिअर केल्या पाहिजे. नविन प्रॉपर्टीची माहिती ऑडीटरकडे देतात. आणि ऑडीटर साहेब आम्हाला माहिती कळवणार.

**दिपक सावंत :-**

आताची जी माहिती आहे. २०११-१२ मध्ये नविन प्रॉपर्टीच असेसमेंट केल. त्याच्याकडुन किती रेव्हेन्यु कलेक्ट झाला. त्याची माहिती मी आपल्याला तीन दिवसात देतो.

**रोहिदास पाटील :-**

आता २०१३ चालू आहे. उदयापासून २०१३-१४ चालू होतो. आपण बजेट २०१३-१४ च करणार ना म्हणजे २०११-१२ चे आपल्याकडे तयार असायला पाहिजे. वसुली झाली की नाही. न होण्याची कारण काय? हे स्पष्ट दिसते............

**दिपक सावंत :-**

वसुली न होण्याच सर्वात महत्वाच कारण म्हणजे काय की, ६ करोड रु. ज्या दुबार नोंद आहेत. ज्या प्रॉपर्टीच दुबार नोंद आहे. उदा. एका प्रॉपर्टीच २-२ असेसमेंट झालेल आहे की, जुने तोडुन नविन बांधले तरी जुन्याच चालू आहे. याच्या व्यतिरिक्त ज्या प्रॉपर्टी अस्तित्वात नाही त्यांची पण नोंद आहे. पण ते तुटलेल्या आहेत.

**प्रमोद सामंत :-**

तुटलेल्या प्रॉपर्टीचा टॅक्स तर येत असणार ना.

**दिपक सावंत :-**

एखादया वेळेस अनधिकृत बांधकाम तोडतो त्याचा टॅक्स तसाच चालू राहतो. असे पण आहेत. त्याच जवळ-जवळ आम्ही ६ करोड रु. चा प्रस्ताव आहे. तो आम्ही स्टँडिंगमध्ये १५२ खाली ठेवणार.

**प्रमोद सामंत :-**

५२ करोडच इस्टीमेशन चुकलेल आहे.

**दिपक सावंत :-**

चुकलेल नाही. हा व्यवहार दयायचा अधिकार स्टँडिंग कमिटीचा आहे. आतापर्यंत तो स्टँडिंगपुढे विषय आलेला नाही. गेल्यावर्षी पण आम्ही प्रस्ताव तयार केला होता. पण आम्हाला त्याचे काही पंचनामे, काही गोष्टी आमच्याकडुन झाल्या नव्हत्या. त्याच्यामुळे स्टँडिंगपुढे आम्ही ठेवल नव्हत. तर ह्यावर्षी आम्ही हा प्रस्ताव ६ करोड रु. त्यातुन व्हेवर करण्याचा स्टँडिंगपुढे ठेवणार आहोत.

प्रमोद सामंत :-

यामध्ये आणखीन एक विषय आहे. ३२ करोड रु. जे जमा झालेले आहेत. त्यामध्ये गेल्या वर्षाची पण थकबाकी असेल ना ती.

**दिपक सावंत :-**

हो.

**प्रमोद सामंत :-**

ती किती आहे?

**मा. उपायुक्त (मु.) :-**

सन्मा. सभापती साहेबांच्या परवानगीने मी ह्यांच्याकडुन माहिती घेण्याची अनुमती घेतो. बजेटमध्ये २०११-१२ साठी अंदाज पत्रकची तरतुद ५२ करोड रु. जाहीर करण्यात आली. परंतु, २०११-१२ मध्ये थकबाकी सहित प्रत्यक्षात मागणीची बिल किती रकमेची पाठवली? डिमांड काय होती? थकबाकी सहित डिमांड आणि त्या डिमांडच्या अगेन्स्ट ही प्रत्यक्षात वसुली झालेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

ह्या अंदाज पत्रकाला आपण २०१०-११ ला मंजुरी दिली. २०११-१२ ला त्यांनी इम्प्लीमेंटेशन दिल.

**मा. उपायुक्त :-**

२०११-१२ मध्ये आपली गतवर्षी जी मागील थकबाकी सहित चालू बिलांची मागणी अशी टोटल रक्कम मागणीची काय? डिमांड रेस केलेली रक्कम किती होती? त्याच्या अगेन्स्ट ही ३२ कोटी वसुल झालेली आहे. अंदाजपत्रक त्यावेळेस नऊ महिन्याच्या विवरण पत्रावर केली होती. २०११-१२ मध्ये किती प्रॉपर्टी टॅक्स अपेक्षित आहे. अंदाज गृहित धरुन बजेट केला जातो. तर प्रत्यक्षात २०११-१२ मध्ये डिमांड रेज किती केली?

**शरद बेलवटे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, बजेटमध्ये जे ५२ करोड रु. दाखवलेली आहे. बजेट बनवताना पाठीमागे व्हॅरियर्स त्यानंतरच करन्ट डिमांड प्लस त्यामध्ये होणारे नैसर्गिक वाढ आणि नविन असेसमेंट हे सर्व विचारात घेवून ती फिगर कॅलक्युलेट केलेली असते. आणि ती फिगर कॅलक्युलेट करताना ॲक्युरेट जो फिगर दिला होता मा. आयुक्तांकडून प्रशासनाकडून आलेला बजेट, हे त्या ५२ करोड पेक्षा कमी आहे. मा. स्थायी समिती सभा आणि मा. महासभेने ५२ करोड रु. ते केलेले आहे.

**प्रमोद सामंत :-**

परसेन्टेज व्हाईज सांगा ना. डिमांड किती परसेन्टेज आहे. जुनी थकबाकी किती परसेन्टेज आहे. सगळे परसेन्टेज व्हाईज सांगा.

**शरद बेलवटे :-**

त्याच डिटेल आहे ना. त्यांच्याकडे त्याशिवाय हे फिगर घेतलेले नाही. परंतु, मा. महासभेमध्ये ती वाढ करण्यात आली. कारण नविन असेसमेंट होईल. हे पकडुन अशी वाढ केलेली आहे.

**प्रमोद सामंत :-**

यामध्ये आणखीन एक विषय आहे. ३२ करोड मध्ये. आपण टॅक्स वाढवलेले. वाढवलेला टॅक्स पण त्यामध्ये आहे.

**दिपक सावंत :-**

२०११-१२ मध्ये वाढवलेला टॅक्स आहे.

**प्रमोद सामंत :-**

मग तो रिफ्लेक्ट झाला असेल ना. गेल्या इस्टीमेटमध्ये रिफ्लेक्ट झाला होता. आणि व्हेवर तुमचा कुठे रिफ्लेक्ट होणार आहे. यामध्ये तुम्ही १७ करोड रु. रिटन केले असेल.

**दिपक सावंत :-**

बजेटमध्ये नाही आपण बिलमध्ये दिलेले आहे.

**प्रमोद सामंत :-**

बजेटमध्ये आल असेल ना. नाही येणार ते. तुम्ही या वर्षात व्हेवर दिलेले आहे ना. मागच्या वर्षीचा व्हेवर यावर्षी दिला आहे ना.

**दिपक सावंत :-**

२०११-१२ मध्ये दिलेल आहे. २०१२-१३ मध्ये नाही.

**प्रमोद सावंत :-**

ठिक आहे. त्याच्यापुढे आणखीन एक विषय आहे. तुम्ही मोकळया जागेवरील टॅक्स वार्षिकमध्ये ३ करोड २० लाख रु. इस्टीमेट केलेला आहे. तुम्ही रेकॉर्ड वसुली केलेली आहे. ७ करोड ५६ लाख. त्याबद्दल त्यांच अभिनंदन. यामध्ये तुम्ही ४ करोड ३६ लाख रु. जास्त कोणाकडुन आणले, कसे आणले? आपण इस्टीमेशन चुकीच केल का? गेल्या वर्षी थकबाकी होती का? या सगळया गोष्टी क्लिअर करा.

**दिपक सावंत :-**

मा. सभापती महोदयाच्या परवानगीने बोलतो, ज्या मोकळया जागा आहेत शहरामध्ये याबाबत करारनामाच महापालिकेने धोरण निश्चित केले होते. आणि त्या कालावधीसाठी त्या बिल्डींग चा जो विकासक असेल त्याच्याकडुन हा टॅक्स वसुल करा. रेडी रेकनरच्या १ % वॅल्यू कॅलक्युलेट करुन त्याच्यावर कराधन करायचा. ठराव पास केला होता. त्या अनुशंगाने २००८ पासुन २०११ पर्यंत ह्याच्याकडुन वसुली झाली नव्हती. २०११ ला माझ्याकडे चार्ज आल्यानंतर जवळ-जवळ २९४ विकासक त्यांची यादी तयार केली.

**प्रमोद सामंत :-**

साहेब, २०११ पर्यंत वसुली झाली नव्हती. असे आता साहेब बोलले. ते आपल्याला बघितल पाहिजे. का वसुली झाली नाही, कोणाची चुक होती हे पण बिघितले पाहिजे. आणि ती कुठे मेन्शन झाली आहे का? बेसिकली आपण इथे बसलो आहोत. शहर चालवण्यासाठी त्या सगळया ज्या प्रत्येक डिपार्टमेन्टल गोष्टी ज्या होतात त्या कुठेतरी मेन्शन झाल्या पाहिजे. आणि त्यावर कारवाई झाली पाहिजे. अस मला नेहमी वाटते. म्हणुन मी मध्ये तुम्हाला थांबवल. कारण हा महत्वाचा मुद्दा आहे. प्रत्येक डिपार्टमेन्टल व्यवहारामध्ये आपल्याकडे ऑडिटर साहेब आहेत. ऑडिटरने दाखवल पाहिजे. आज ८ महिने झाले अजुन आपला ऑडिट रिपोर्ट येत नाही. आणि ऑडिट रिपोर्ट आला तरी त्यावर कुठलीच कारवाई होत नाही. आपण तीन वर्षाचा ऑडिट रिपोर्ट आला तरी त्यावर कुठलीच कारवाई होत नाही. आपण ३ वर्षाचा रिपोर्ट एकत्र सॅन्शन केला २००६ पासुन २००९-१० चा तहकुब रिपोर्ट अजून सभेत आला नाही. खरं म्हणजे आला पाहिजे होता. साहेब, जर अशाप्रकारे चालल तर काहीच होणार नाही. या सगळया गोष्टी कुठेतरी अंडरलाईन झाल्या पाहिजे आणि त्यावर कारवाई झाली पाहिजे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

सावंत साहब का अभिनंदन. बहुत अच्छा मुद्दा उठाया उन्होंने। ३ करोड २० लाख की वसुली होनी चाहिए उसकी जगह ७ करोड ५६ लाख की हो गई बहुत अच्छी बात है। लेकीन इसमें यह नहीं मालुम पडा की ७ करोड की जगह १० करोड भी वसुल हो सकता था। मा. सभापती महोदय, मेरी ऐसी अपेक्षा है की, आप इनस्ट्रक्शन दे की, कुल कितना बकाया बाकी है अभितक? उसका निश्चित करिए। ७ करोउ का १७ करोड होता है। जो बिकता है प्लस मे वह मायनस मे भी हो सकता है। लिस्ट निकाल के दि जाए की, कितना बाकी है?

**प्रमोद सामंत :-**

आपण जे इस्टीमेशन करतो. ते प्रॉपर इस्टीमेशन होईल. तर तुमच्याकडे अकाऊंट बुक आहे. ते अकाऊंट बुक दाखवा. त्यांच काय इस्टीमेशन तुम्ही आता चार्ज घेतला वसुली केली. तुमच्या म्हणण्याप्रमाणे आपण आता स्टँडिंगला सांगा एक्जॅक्ट किती आपल्याला ७ करोड ५६ लाख कमी आहे की एक्सेस झालेला आहे. ते सांगावे.

**दिपक सावंत :-**

कमी नाही. जो असेसमेन्ट आपण चालू केल्यानंतर आता २००८ पासुनची वसुली केली. जे-जे विकासक असतील. ते ज्यावेळेस ओ.सी. साठी येतात धनेगावे साहेब होते आम्ही त्यांच्याशी चर्चा करुन जो विकासक ओ.सी. घ्यायला आला का त्याच्यानंतर त्यांनी हा एक क्लॉज टाकला की, तुम्ही ओपन लँडचे पण पैसे भरा नंतरच तुम्हाला हे दिले जाईल. कमिश्नर साहेबांनी मिटींग घेतली होती. याच्यामध्ये २००८ पासुनचे आहेत. वार्षिक जे बघितल तर आता जे नमुद केल ते बरोबर आहे. हे एरियस मागचे आलेले आहेत.

**प्रमोद सामंत :-**

यावर्षीचे ३ करोड २० लाख रु. आणि ३ वर्षाचे ७.५० करोड.

**दिपक सावंत :-**

हो. इस्टीमेट अस आहे की, मोकळ्या जागेवर कर करताना जेवढे आपण बिल्डींगला परमिशन देवू त्याप्रमाणात आपल्याला येणार आहे. आपण ..........

**प्रमोद सामंत :-**

परसेन्टेज व्हाईज बोला ना. एवढं परसन्ट आता होत. मग, कन्स्ट्रक्शन अंदाजे एवढ परसेन्टेज होते. बजेट बनवताना तुम्ही तस केल असेल ना. तुम्ही इस्टीमेट कस केल? मनाला येईल तस इस्टीमेट केल का?

**दिपक सावंत :-**

आपण मागच्या वर्षी जे इस्टीमेट केल होत त्याप्रमाणे बनवल.

**प्रमोद सामंत :-**

मागच्या वर्षीच इस्टीमेट चुकल असेल तर यावेळी पण तुम्ही चुकणार का?

**दिपक सावंत :-**

अंदाज आहे.

**प्रमोद सामंत :-**

अंदाज म्हणजे चुकीचा अंदाज बांधायचा नाही ना आपल्याला आपण इथे तज्ञ आहोत. तुम्ही तज्ञ आहात. तुम्ही चुकीचे अंदाज बांधुन लोकांना मिसगाईड करु नका.

**दिपक सावंत :-**

चुकीचे अंदाज नाही आहे.

**प्रमोद सामंत :-**

तुम्ही इस्टीमेट करताना अस ठरवा आपण यावेळी पास करु. कन्स्ट्रक्शन होणार म्हणजे ओपन लँड कमी होणार. म्हणजे १०% एरियाच कन्स्ट्रक्शन होणार. म्हणजे १०% कमी होणर. पण, त्याला ओ.सी. सी.सी. परत लागणार. म्हणजे त्याचा आपल्याला टॅक्स मिळणार. तुम्ही ते परसेन्टेज व्हाईज सांगा मला.

**प्रविण पाटील :-**

ओपन लँडचा टॅक्सचा ठराव कधी आला?

**दिपक सावंत :-**

२००८ साली झाला.

**सत्यवान धनेगावे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, वॅकेन्ट लॅण्ड टॅक्स हा ज्या बांधकाम प्रस्तावाला कमिसमेन्ट सर्टिफिकेट दिलेल आहे. त्या कमिसमेन्टच्या डेट पासुन ऑक्युपेशन सर्टिफिकेट डेट या पिरेडसाठी आहे. हा मुळात ठराव झाला दि. १/४/२००८ ला. परंतु, दरम्यानच्या काळामध्ये त्याचे प्रभावीपणे वसुली झालेली नाही. म्हणुन हे आताचे आयुक्त साहेब आल्यानंतर याबाबत टॅक्स डिपार्टमेंट, आमच डिपार्टमेंटची संयुक्त बैठक झाली. त्याबाबत तत्कालीन स्थायी समितीमध्ये ३-४ वेळेस विषय झाला. बजेटच्या वेळेस चर्चा झाली. पुर्नविनियोजनाच्या वेळेस चर्चा झाली. त्यानंतर इफेक्टीव्हली अंमलबजावणी सुरु केल्यानंतर ३ करोडच्या ऐवजी ७ करोड रु. जमा झाले. त्याच्यामध्ये एरियस पण आहे. ती अमाऊंट आहे ती आपल्याला निश्चित करता येत नाही. बांधकाम परवानगी दयायच आपल्याला हातात आहे. परंतु त्याचा परवाना केव्हा मिळणार हे आपल्या हातात नाही. त्यामुळे निश्चितपणे सांगण बांधताच येणार नाही. मागच्या वसुलीच्या आधारे पुढचा अंदाज ठरला जातो.

**प्रमोद सामंत :-**

तुमच म्हणन मला पटतय, मागचा अंदाज आपण कधी-कधी चुकतो. शेवटी आपल्याकडे कुठेतरी परसेन्टेज व्हाइज असेल ना की............

**सत्यवान धनेगावे :-**

पुढच्या स्टँडिंगमध्ये दुरुस्त करुन घेवूया.

**प्रमोद सामंत :-**

मी त्यांच अभिनंदन करतो की, यावेळी मा. आयुक्त साहेबांनी पुढाकार घेऊन जास्त वसुली केली ठिक आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेबांच अभिनंदन करा. त्यांनी एवढी मोठी वसुली केली.

**प्रमोद सामंत :-**

डेफिनेटली आयुक्त साहेबांच अभिनंदन करतो. अधिकारी वर्गाच, सावंत साहेबांच, मा. महापौर मॅडमच पण अभिनंदन करतो. पण, यामध्ये मला अस कुठेतरी दिसत की, आपण कुठेतरी कर आकारणी करतो. त्यामुळे कुठेतरी चुकीच आहे. ५२ करोड रु. आपण इथे इस्टीमेट पकडले. आता बजेट बनवायची वेळ आलेली आहे. मग, यावर आपल्याला गाईड कोण करणार?

**सत्यवान धनेगावे :-**

आपण आता आपल गाइडन्स घेवून ..........

**प्रमोद सामंत :-**

आम्ही टेक्नीकल नाही ना. टेक्नीकली कोण करणार?

**सत्यवान धनेगावे :-**

मागच्या वेळेतसुध्दा या स्थायी समितीमध्ये वॅकेन्ट लँड टॅक्सच्या बाबतीत बराच वेळा चर्चा झालेली आहे. चर्चा न करता कुठलेही विषय होत नाही.

**प्रमोद सावंत :-**

यावर मला अस सांगायच आहे. आपण या गोष्टीसाठी कुठेतरी टेक्नीकली क्वालिफाईड, टेक्नीकली जो माणुस आपल्याला समजावू शकतो. त्याचा आधार घेतो की नाही?

**सत्यवान धनेगावे :-**

घेतो ना.

**प्रमोद सामंत :-**

मग, आपण २००८ पासुन ते आतापर्यंत त्या गोष्टीसाठी टेक्नीकल क्वॉलीफाईड माणसाचा कधी आधार घेतला का?

**सत्यवान धनेगावे :-**

विषय असा आहे की, बांधकाम परवानगी नगररचना कडुन दिली जाते. टॅक्स वसुली टॅक्स डिपार्टमेंट कडुन दिली जाते. त्यामुळे तो टेक्नीकलचा विषय नाही.

**प्रमोद सामंत :-**

या सगळया असेसमेंटसाठी टेक्नीकल माणुस कोण आहे? आपण बरोबर असेस्ट करतो की नाही करत?

**सत्यवान धनेगावे :-**

त्यासाठी मा. महासभेने ठराव केलेला आहे. ठरावामध्ये सुचना स्पष्ट आहेत. त्या सुचनेच्या आधारे वसुली होते. त्यात वेगळ असेस्ट करायची गरज नाही.

**दिपक सावंत :-**

रेडी रेकनर सारख करतो.

**प्रमोद सामंत :-**

रेडी रेकनर ठिक आहे. कदाचित तुम्ही म्हणता तेही बरोबर आहे. पण मला अस वाटते आपण आपल्याकडे या सगळया गोष्टीसाठी, इथे आणखीन बरेच विषय आहेत. मी आणखीन तुमचा थोडा वेळ घेणार. या गोष्टीसाठी आपल्याकडे आपल्या चुका, प्रशासनाच्या होणाऱ्या चुका किंवा काही गोष्टी आपण चुकत असतो. किंवा काही गोष्टी आमच्या सत्ताधारकांकडुन, विरोधकांकडुन लक्षात राहत नसतील आम्ही टेक्नीकल एक्सपर्ट नाही आहोत. त्यासाठी आपल्याकडे एक वेगळी बॉडी आहे. ऑडिटर आहेत ऑडिटरने आतापर्यंत आपल्याला या विषयी कुठल्याही स्टँडिंगला ही टेक्नीकली काल जे आमच प्रशिक्षण झाल. त्यामध्ये अस सांगण्यात आले की, ऑडिटरकडुन स्टँडिंगने विकली जमा खर्च रिपोर्ट घेतला पाहिजे. विकली शक्य होत नाही. पंधरा दिवसात घेतले पाहिजे. महिन्या भरात घेतला पाहिजे.

**बर्नड डिमेलो :-**

मला तर अस वाटते की, सर्व नगरसेवकांना लॅपटॉप द्यायला पाहिजे. म्हणजे ताबडतोब त्याच्यामध्ये ट्रान्सफर करता येईल.

**प्रशांत दळवी :-**

सन्मा. सदस्यांनी जी सुचना मांडली त्याच्याशी मी सहमत आहे. दुसर एक महत्वाचे आहे. मा. सभापती महोदय, सत्तेत असताना आमच्या सन्मा. सदस्यांनी काही मागणी केली, जे काही डिसकशन झाले. त्या विषयावर बोलत असताना विरोधी पक्ष आणि सत्ताधारी जे काही मौन पाळल त्याबद्दल मी त्यांच अभिनंदन

करतो. आणि विरोधक जेव्हा चर्चा करत असतील त्यावेळेला सत्ताधारींनी पण मौन पाळाव. अशी अपेक्षा बाळगतो.

**बर्नड डिमेलो :-**

बघा हे बजेट आहे बजेटमध्ये तुम्ही बोलु शकता जर तुम्हाला तो विषय नको तर विरोधात ठराव मांडा.

**संदिप पाटील :-**

मा. सदस्य बर्नड डिमेलो. प्रत्येक विषयावर चर्चा झाल्यानंतर काहीतरी निष्कर्ष चांगला होईल ना.

**प्रमोद सामंत :-**

मला असे सांगायच आहे की, या विषय ऑडीटर रिपोर्ट लवकरात लवकर आला पाहिजे. किती दिवसात देवू शकता.

**भागवत मुरकुटे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो मला विभागाकडुन पूर्ण माहिती अजुनपर्यंत आलेली नाही. आलीतर महिन्यापर्यंत माहिती देऊ शकतो.

**प्रमोद सामंत :-**

विभागाला माहिती लवकरात लवकर दयायला सांगा.

**प्रशांत दळवी :-**

माहिती तुमच्याकडे कधी उपलब्ध होणार आहे.

**भागवत मुरकुटे :-**

विवरण पत्र देतो तुमच्याकडे.

**प्रशांत दळवी :-**

कधीपर्यंत देणार आहे माहिती दया पण ........

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेब, मला अस वाटते हा विषय जो चालला आहे. विकली नको तर कमीत कमी ३-३ महिन्याचा तरी रिपोर्ट पाहिजे. तर लॅपटॉप सगळया नगरसेवकांना दिल तर विकली सगळयांना डेटा मिळत जाईल. महापालिकेने किती वसुली केली आणि किती होणार आहे. मला तरी वाटते त्यांना विचारावा आणि प्रत्येकांनी मला सहकार्य कराव पहिले मी ठराव मांडतो नंतर मी सुचना मांडतो.

**संदिप पाटील :-**

सन्मा. बर्नड डिमेलो यांनी जी सुचना मांडलेली आहे त्याला माझ सहमत आहे.

**बर्नड डिमेलो :-**

सन २०११-२०१२ चा वार्षिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करून मा. स्थायी समितीसमोर माहितीकरिता सादर करण्यात आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २०११-१२ च्या वार्षिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे.

**प्रमोद सामंत :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०७ :-**

वार्षिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत. (सन २०११-२०१२)

**ठराव क्र. ०७ :-**

सन २०११-२०१२ चा वार्षिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करून मा. स्थायी समितीसमोर माहितीकरिता सादर करण्यात आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २०११-१२ च्या वार्षिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८, त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत. (माहे १ एप्रिल २०१२ ते ३० जून २०१२)

**बर्नड डिमेलो :-**

सन २०१२-२०१३ आर्थिक वर्षातील माहे १ एप्रिल २०१२ ते ३० जून २०१२ पर्यंतचा त्रैमासिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करून मा. स्थायी समितीसमोर माहितीकरिता सादर करण्यात आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २०१२-२०१३ आर्थिक वर्षातील माहे १ एप्रिल २०१२ ते ३० जून २०१२ पर्यंतच्या त्रैमासिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे.

**राजेश वेतोसकर :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय, यामध्ये एस्कॉटचा विषय आहे. त्यावर २४ करोड ५५ लाखाची तरतुद केलेली आहे. हा काय प्रकार आहे. हे बजेट का फुगवून ठेवलेला आहे? आणि याची जबाबदारी कोणाला दिलेली आहे? एस्कॉट चालु आहे का? एस्कॉट चालु नाही. मग बजेटमध्ये त्याचा उल्लेख का केला आहे?

**मा. उपायुक्त :-**

परिक्रमण शुल्क चालु करण्याबाबत आपला प्रस्ताव होता. त्याप्रमाणे तो मंजुरीसाठी, नाके उभारण्यासाठी, परिक्रमण शुल्कसाठी, नाके उभारण्यासाठी प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवला होता. परंतु, पोलिसांनी अदयापपर्यंत परवानगी दिली नाही. त्यामुळे त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करता आली नाही.

**प्रशांत दळवी :-**

या बाबतीत पाठपुरावा कोण करत? हे कोणाकडे दिलेल आहे?

**मा. उपायुक्त :-**

मी स्वतः आणि आयुक्त साहेबांनी पाठपुरावा केलेला आहे या संदर्भात एस.पी. साहेबांनी आणि पोलिस अधिकाऱ्यांशी पण वारंवार पाठपुरावा केला आहे. त्यांच्याकडुन अजुन नाके उभारण्यासाठी परवानगी मिळाली नाही.

**रोहिदास पाटील :-**

ज्याच्याबद्दल तुम्ही पाठपुरावा करता तुम्हाला त्याबद्दल खात्री असायला पाहिजे ना की, यश मिळेल म्हणुन.

**प्रशांत दळवी :-**

तुम्ही बजेटला प्रोव्हिजन केल आहे.

**रोहिदास पाटील :-**

जेव्हा पश्चिम द्रुतगती मार्गावर १ रु. वसुली करायचा अधिकारच नाही. तुम्ही सभागृहाची दिशाभुल करुन हे केल. २ वर्ष, ३ वर्ष झाल. खतगांवकर साहेबांपासुन हा पथकरच नाटक चालतय. आम्ही प्रत्येक वेळेला तुम्हाला विरोध केला आहे. यश येत नाही तरी उगाच ॲड करता.

**प्रशांत दळवी :-**

आणि गेल्यावेळी २२ करोड होता यावेळी २४ करोड केले आहे. अस का केल? खुलासा करावा ना. जर चालुच नाही तर आपल्याला परवानगी मिळाली नाही चालु करायची. मग गेल्यावेळेला २२ करोड यावेळेला २४ करोड रु. हा काय प्रकार आहे? का उगाचच बजेट फुगवून ठेवायचा विषय आहे.

**मा. उपायुक्त :-**

या बाबतीत धोरण निश्चित करताना हा जो पुढील अनुभव आलेला आहे. परवानगी मिळत नाही. किंवा नाके प्रत्यक्षात उभे करुन वसुली करता येणार नाही. तर ह्यावेळेला बजेट करताना या बाबीचा विचार करुन करता येईल.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०८ :-**

त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत. (माहे १ एप्रिल २०१२ ते ३० जून २०१२)

**ठराव क्र. ०८ :-**

सन २०१२-२०१३ आर्थिक वर्षातील माहे १ एप्रिल २०१२ ते ३० जून २०१२ पर्यंतचा त्रैमासिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करून मा. स्थायी समितीसमोर माहितीकरिता सादर करण्यात आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २०१२-२०१३ आर्थिक वर्षातील माहे १ एप्रिल २०१२ ते ३० जून २०१२ पर्यंतच्या त्रैमासिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. राजेश वेतोसकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९, त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत. (माहे १ जुलै २०१२ ते ३० सप्टेंबर २०१२)

**बर्नड डिमेलो :-**

सन २०१२-२०१३ आर्थिक वर्षातील माहे १ जुलै २०१२ ते ३० सप्टेंबर २०१२ पर्यंतचा त्रैमासिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करून मा. स्थायी समितीसमोर माहितीकरिता सादर करण्यात आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २०१२-२०१३ आर्थिक वर्षातील माहे १ जुलै २०१२ ते ३० सप्टेंबर २०१२ पर्यंतच्या त्रैमासिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे.

**प्रमोद सामंत :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय अनधिकृत बांधकामासाठी आपण जी २०० करोड रु. ची तरतुद केलेली आहे. त्यानुसार किती जमा झाली. १६८ बॅलेंस आहे. मग, अनधिकृत बांधकामावरती नोटिस बजावयला किती अनधिकृत बांधकामवर कारवाई झाली? किती विषय पेंडींग आहेत? त्याचा खुलासा करा.

**मा. उपायुक्त :-**

अनधिकृत बांधकामाचा विभाग माझ्याकडेच आहे. प्रभाग निहाय माहिती अदयावत करायला मी सुचना दिलेली आहे. त्यांना विहीत नमुना केलेला आहे. तर पुढच्या सभेमध्ये माहिती देण्यात येईल.

**प्रशांत दळवी :-**

साहेब, सभेत आज विषय आहे. आणि आपण म्हणता पुढच्या सभेत माहिती देतो. आज तुम्ही आम्हाला काय खुलासा करणार ह्याच्या बाबतीत? किती विषय पेंडींग आहेत ते सांगाव ना. किती तोडलेले आहेत? २ करोडची तरतुद आहे ना त्यामध्ये.

**मा. उपायुक्त :-**

त्याबाबत दिलगीरी व्यक्त करण्यात येते. ती माहिती अदयावत तयार नाही आहे.

**संदिप पाटील :-**

पुढच्या सभेमध्ये आम्हाला संपूर्ण माहिती दयावी या विषयाबद्दल. मा. सभापती महोदय या विषयावर जरा लक्ष घाला की, मंजुर करायच की तसच पेंडींग ठेवायच?

**शरद पाटील :-**

कसली माहिती नसताना सुध्दा मंजुर करायच.

**बर्नड डिमेलो :-**

माहिती नाही कसली आम्ही अभ्यास करुन आलो आहोत.

**शरद पाटील :-**

अरे पण त्यांनी सांगितल ना नाही दयायची माहिती मग तुम्ही सांगा.

**बर्नड डिमेलो :-**

अभ्यास केला आहे. मंजुर झाल्यावर तुम्ही हे करताय.

**शरद पाटील :-**

तुम्ही ठरावच मांडता, नंतरच चर्चा आहे ना.

**प्रशांत दळवी :-**

अगोदर पण तुम्ही करु देत नाही चर्चा.

**संदिप पाटील :-**

प्रत्येक विषयावर ही चर्चा झालीच पाहिजे.

**बर्नड डिमेलो :-**

बजेटमध्ये बसणार आहेत ना तुम्ही.

**प्रशांत दळवी :-**

अनधिकृत बांधकाम जे तोडले त्याला किती वसुली झाली?

**बर्नड डिमेलो :-**

बजेटमध्ये आपण विषय घेणार. पण, आता अनधिकृत बांधकामाचा विषय नाही.

**प्रशांत दळवी :-**

का विषय नाही? त्याच्यात विषय आहे ना. विषय का नाही घेणार? चर्चा ठरावाच्या अगोदर करायची की नंतर करायची.

**संदिप पाटील :-**

आता बजेटमध्ये तो विषय आहे तर तो झालाच पाहिजे ना.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

पहिल्यांदा मी ह्याच्याबद्दल खुलासा करतो की, ही तिमाई जी आहे. प्रत्यक्षात आकडेवारी आहे जी जमा झालेली आहे किंवा नाही. ज्या ठिकाणी जमा झालेली असेल त्या ठिकाणी जमा झालेली आहे. प्रत्यक्ष जमा झालेली नाही तर जमा झालेली नाही. का जमा झाली नाही आणि अनधिकृत बांधकामाच स्टेटस. किती बांधकाम आहे? किती पाडली, कितींना नोटिस दिल्या आणि किती वसुली झाली? या प्रभाग निहाय बिगतवारी जी आहे त्याबाबतचा अहवाल पुढील सभेत ठेवण्यात येईल. या प्रत्यक्षात तिमाईमध्ये वसुली झालेली नाही. ही वस्तुस्थिती आहे.

**प्रशांत दळवी :-**

वसुली झालेली नाही ही वस्तुस्थिती आहे. आणि त्याचा लेखाजोखा आपल्याकडे नाही.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

या कालावधीमध्ये जे दिलेले आहे त्याच्यामध्ये वसुली झालेली नाही. किंवा ते अनधिकृत बांधकामाच्या ज्या पाडण्याच्या कार्यवाहीच्या संबंधिताकडून वसुल करण्याची जी कार्यवाही अपेक्षित होती. ती झालेली नाही. आणि जी इथे रिफ्लेक्ट झालेली नाही अस नाही. तर प्रत्यक्षात वसुली झालेली नाही.

**प्रशांत दळवी :-**

म्हणजे जी बांधकाम तोडलेली आहे त्याची वसुली झालेली नाही.

**संदिप पाटील :-**

पुढच्या सभेमध्ये ह्याचा संपूर्ण खुलासा करुन दया.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०९ :-**

त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत. (माहे १ जुलै २०१२ ते ३० सप्टेंबर २०१२)

**ठराव क्र. ०९ :-**

सन २०१२-२०१३ आर्थिक वर्षातील माहे १ जुलै २०१२ ते ३० सप्टेंबर २०१२ पर्यंतचा त्रैमासिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करून मा. स्थायी समितीसमोर माहितीकरिता सादर करण्यात आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २०१२-२०१३ आर्थिक वर्षातील माहे १ जुलै २०१२ ते ३० सप्टेंबर २०१२ पर्यंतच्या त्रैमासिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०, आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**बर्नड डिमेलो :-**

उपरोक्त विषयानुसार महानगरपालिका हद्दीत काही ठिकाणी पाणी पुरवठा सुधारणा होण्याच्या दृष्टीकोनातून खालील कामे करणे गरजेचे आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) येथे डोंगरी बर्फ फॅक्टरी ते आनंद नगर पर्यंत नविन बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु. ३८,७५,०००/- |
| २ | मिरारोड (पूर्व) येथे गिरीराज टॉवर ते शितल आर्केड इमारतीपर्यंत बिडाची वितरण जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रु. ३३,२८,४००/- |
| ३ | महानगरपालिकेद्वारे पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी टँकरचा प्रति फेरा दर निश्चित करणे. | रु. ५०,००,०००/- |

तरी वरील कामे करणे अत्यावश्यक असल्याने उपरोक्त कामांना मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**प्रमोद सामंत :-**

माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब मला ह्या विषयावर बोलायचे आहे.

**हेलन गोविंद :-**

मा. सभापती साहेब मला या विषयावर सुचना मांडायची आहे. भाईंदर (पश्चिम) डोंगरी बर्फ फॅक्टरी ते आनंद नगर पर्यंत नवीन पाईप लाईन टाकण्याचे रुपये ३८ लाख ७५ हजाराचे काम आपण घेतले आहे. परंतु, त्याच्यापुढे पाईप लाईन अत्यंत खराब आहे. पाणी गळती मोठ्या प्रमाणात होते. परिणामी उत्तन, पाली व चौकच्या लोकांना पाणी कमी प्रमाणात मिळते. तेव्हा आनंद नगर (डोंगरी) पासून ते उत्तन पाण्याच्या टाकीपर्यंत बिडाची जलवाहिनी टाकण्याच्या कामाला आर्थिक व प्रशासकीय मंजूरी घ्यावी अशी माझी सुचना आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपण हे जे दिलेल आहे ठिक आहे. पण याची लांबी किती रुंदी किती? किती इंचाची काय? त्याच काहीच नाही. आम्ही मंजुरी देतोय म्हणजे फक्त पैसे लिहिले तेवढे पैसे दयायचे. पण त्याच आम्हाला काहीच समजत नाही.

**संदिप पाटील :-**

मा. सभापती साहेब, माझी एक सुचना आहे की राई स्मशानापासुन ते मुर्धा खाडीपर्यंत, राई, मोर्वा आणि मुर्धा या तिन्ही गावात पाण्याच एकदम लो प्रेशर आहे. मेने पत्र दिया है तो उसका निवारण करेंगे तो अच्छा होगा।

**सुरेश वाकोडे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, डोंगरी बर्फ फॅक्टरी ते आनंद नगर पर्यंत जी लाईन आहे ती ३०० एम.एम. ची लाईन आहे. ६५० मी. लाईन आहे. ती आपण रिफ्लेक्स करतो.

**रोहिदास पाटील :-**

आता अस्तित्वात किती आहे आणि किती वाढवता?

**सुरेश वाकोडे :-**

ही जी लाईन आहे ना ही लाईन शेतामध्ये गेलेली लाईन आहे. ही फार जूनी आहे. १९८५ साली ही लाईन टाकलेली आहे. त्याच्यामुळे गळतीच प्रमाण फार होत आहे. आणि इयर वैगेरे त्याठिकाणी प्रॉब्लेम जास्त होतो. आणि पावसाळयात ह्या ठिकाणी लिकेज काढण त्रासाच होत आहे. त्यामुळे आपण हे ऑल राऊंड लाईन टाकतो.

**हेलन गोविंद :-**

उत्तन पर्यंत, चौक, पाली लोकांना पाणी भेटत नाही. तिथे पाण्याच प्रमाण फार कमी आहे. लोकांचे फार हाल होतात. ह्याच्यावर थोड लक्ष दया. ती बरीच वर्षाची जुनी पाईप लाईन आहे.

**सुरेश वाकोडे :-**

जागेवर बघुन अंदाजपत्रक तयार करु.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय, आमच्या पण सदस्यांनी सुचना केली आहे, त्याच पण उत्तर दयाना.

**सुरेश वाकोडे :-**

राई, मोर्वा त्या भागामध्ये पाणी पुरवठा चांगला होण्यासाठी आम्ही प्रयत्न करुन तिथला पाणी पुरवठा व्यवस्थित करुन घेवू या. आणि आवश्यक जिथे असेल त्या ठिकाणी पाईप लाईनच इस्टीमेट तयार करुन साहेबांची मान्यता घेवू.

**संदिप पाटील :-**

साहेब आता राई स्मशान भुमीच्या इथे पाईप लाईन टाकायच काम चालु आहे त्याच्यानंतर राई स्मशानापासुन ते बामनदेव नगर पर्यंत तिथुन पाईप लाईन जर टाकली, मला वाटत नाही राई, मोर्वा, मुर्धापर्यंत पाण्याचा तुटवडा कधी राहील अस. पाईप लाईनच मी पत्र दिलेल आहे. ते पुढच्या सभेमध्ये आलं तर फार बर होईल.

**सुरेश वाकोडे :-**

त्याच इस्टीमेट तयार करुन घेतो. पहिल मोर्वापर्यंत ही जी लाईन टाकली ना. ती लाईन पहिली चार्ज करु. ती लाईन चार्ज केल्यानंतर ऑटोमॅटीकली आपल्याकडे पाण्यामध्ये सुधारणा होणार. आणि त्याच्यानंतर पुढे जे असणार आहे ते टप्पा-टप्याने काम करणार आणि त्याच इस्टीमेट तयार करु.

**रोहिदास पाटील :-**

वाकोडे साहेब, बर्फ फॅक्टरी ते आनंद नगर आता अस्तित्वात असलेली पाईप लाईन कसली आहे? ए.सी. आहे सी.आय.जी. आहे कोणती आहे?

**सुरेश वाकोडे :-**

सी.आय.जी. लाईन आहे.

**रोहिदास पाटील :-**

आता कोण करणार?

**सुरेश वाकोडे :-**

आता सी.आय.जी. टाकणार आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही सांगितल लिकेज आहे. लिकेज कुठे आहे?

**सुरेश वाकोडे :-**

ती लाईन सारखी लिकेज होते. जी लाईन आहे त्याची थिकनेस कमी झालेली आहे. ८५ साली टाकलेली लाईन आहे. वारंवार फुटते त्या ठिकाणी हा सारखा प्रॉब्लेम होतो. त्यामुळे रिप्लेस करतो.

**रोहिदास पाटील :-**

ही पाईप लाईन कधी टाकली आठवते?

**सुरेश वाकोडे :-**

ही जुनी आहे. ८६-८७ साली टाकलेली लाईन आहे.

**रोहिदास पाटील :-**

८६-८७ साली सगळया एसी लाईन होत्या. त्या वेळेला सी.आय.जी. नव्हती. सगळया सिमेन्टच्या होत्या. त्या वेळेला सी.आय.जी. नव्हती. सगळया सिमेंटच्या होत्या. त्या बदली करुन आपण सी.आय. टाकल्या. सी.आय. टाकल्यानंतर त्या पाईप लाईनच आयुष्य किती वर्षाच आहे? तुम्ही गरजेसाठी पाईप लाईन वापरत असाल तर ठिक आहे. पण ती निरुपयोगी ठरली असे सांगत असाल तर ते चुक आहे. अस ती निरुपयोग होणार नाही. झिजत नाही. पाण्यात झिजली असे होणार नाही. शेतातुन तो सगळा डोंगराळ भाग आहे. त्यात शेतात पाईपलाईन कुठे गेली? रस्ता सगळा वरुन आहे.

**सुरेश वाकोडे :-**

ती पाईप लाईन टाकलेली आहे. ती मधल्या शेतामधुन टाकलेली आहे.

**हेलन गोविंद :-**

काका ती लाईन पूर्ण शेतामधुन आलेली आहे. तुम्ही जाऊन बघा आणि ती लिक पण होते.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, तुम्ही सांगता ते बरोबर आहे. पण ती सी.आय. आहे तर गळती राहिलीच नाही पाहिजे. त्याच काम चुकारपणा आहे हे मला दाखवायच आहे. सी.आय. लाईनचे गळती व्हायचे कारण काय? सी.आय. लाईनची गळती झाली. कुठे झाली आणि कशी झाली? ते फक्त आठ तासाच काम आहे.

**हेलन गोविंद :-**

काका ती ग्रामपंचायत मधली जुनी पाईप लाईन आहे. त्यामध्ये साहेबांचा दोष नाही.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, सी.आय. लाईनच तुम्ही पाईपलाईन पडेल, पाणी वाढेल, पाणी येईल हा विषय वेगळा आहे. तुम्ही ज्या सुविधा देता तो विषय वेगळा आहे. अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन टिकवण त्याला सर्व्हिस देण हे तुमच काम आहे. आणि गळती २०% आहे अस तुम्ही अजुनही लेखी उत्तर देता आमच्या कानसिंगच अजुन उत्तर दिल नाही. २०% पाणी गळती आहे. ११६ एम.एल.डी. पैकी २० गेले म्हणजे ९४ एम.एल.डी. राहिले. एवढ गळती राहील तर कस चालेल. गळते कुठे ते सांगा. सभागृह तुम्हाला मदत करेल कशाला मंजुरी पाहिजे ते फक्त तुम्ही सांगा. गळती काढण्यासाठी ज्या रकमेला मंजुरी पाहिजे असेल. मला अस वाटत अधिकार सभापती साो. चा आहे. पण त्यांनी सांगितल इतक्या कोटी रु. ला मंजुरी दयायची आहे. तर कोणी नाही सांगायचा प्रश्न येत नाही. लोकांना पाणी मिळत नाही. आणि आपण गळती होते अस सांगु. आता तुम्ही निवेदन केल त्याला तीन महिने झाले. या शहरातली कुठेही असेल गळती ते तीन महिन्यात निघायला पाहिजे होत. आम्ही तुम्हाला सांगु शकतो ना. प्रभाग क्र. ५ मध्ये या झिरो गळती आहे. १००% लिक्रुप आहे अस सांगतो मी तुम्हाला. सांगा की, आम्ही पाहणी केली आणि तुम्ही खोटं निवेदन केले. सभागृहातल्या सगळया सदस्यांना जर तुम्ही विचारल नागरीकांना विचारल कुठे गळते, तुमचे कर्मचारी पोचणार नाही इथपर्यंत खरं आहे. तस तरी गळती थांबवता येईल ना. साहेब लोकांना पाणी मिळत नाही आपण उत्तर देतो पाणी टंचाई, पाणी टंचाई १४ % कपात झाली लोकांकडे दुसरा पर्याय नाही. आपले पाणी वाचवा. मा. सभापती साहेब, त्यांचा पुन्हा विचार करुन सांगा. कुठे लिकेज साठी काढायच आहे तरच ही सभा तुम्हाला मंजुरी देईल.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती साहेब, माझी एक विनंती आहे तुम्हाला प्रभाग क्र. ३८ मध्ये ६ इंचाची पाईपलाईन दिवाळीपूर्वी टाकण्यात आली आणि त्याच्या अगोदर शांती स्टार बिल्डर ने टाकलेली ४ इंचाची पाईप लाईन ती गटारामध्ये आहे. जेणेकरुन तिकडे किती लिकेज आहे की नाही कळत नाही. हा फार गंभीर प्रश्न आहे. म्हणजे बाहेरुन दिसण्यात येत नाही. वरुन पेवर ब्लॉक लावण्यात आलेल आहे. जी आता ६ इंचाची पाईप लाईन टाकण्यात आलेली आहे. माझी तुम्हाला एक विनंती राहील की त्या ठेकेदारांना समज दया. त्या ठेकेदाराने दिवाळीपूर्वी पाईप लाईन टाकण्याच काम सुरु केलेल आहे. उदयाप पूर्ण झालेल नाही. अजुन त्यातुन नविन कनेक्शन देण्यात आलेल नाही. आणि त्याठिकाणी त्योवेळी छोटेसे रस्ते आहेत तिथे खोदकाम चालु असताना कोणत्याही अधिका-याला तिथे बोलवल जात नाही. एम.टी.एन.एल., रिलायन्स वाला कोणीही अधिकारी तिकडे

उपलब्ध नसतो. मग, अशा परिस्थितीत काही अडचण निर्माण झाली तर त्याला जबाबदार कोण? आणि आता टाकली आहे तर वरुन डांबरीकरणही झालेले नाही. बिल्डींग कडून पैसे ही जमा करण्यात आले. ५००-१००० रु. नोटिस फी देवून मग अस असताना कनेक्शन का करण्यात आल नाही.

**सुरेश वाकोडे :-**

६ इंचाची लाईनच बोलता ना. ते मी जातीन बघुन घेतो. आणि त्या ठिकाणी............

**प्रशांत दळवी :-**

साहेब, दिवाळी पूर्वी खोदकाम चालु केल. त्यांना एवढी रिक्वेस्ट करतो. मी त्यांना फोन करतो. सतत माझा पाठपुरावा चालु आहे. आपण पैसे मागण्याची नोटिस प्रत्येक सोसायटींना दिलेली आहे. प्रत्येक सोसायटीने पैसे ही भरलेले आहे.

**सुरेश वाकोडे :-**

आठ दिवसामध्ये हा विषय संपून घेणार. आपण त्या लाईनचे कनेक्शन चेक करुन घेवू.

**संदिप पाटील :-**

लाईनचे कनेक्शन आणि पाईप लाईन टाकल्यावर परत रि सर्फिसिंग कोण करणार?

**सुरेश वाकोडे :-**

रि सर्फिसिंग हे बांधकाम विभागातर्फे करणार.

**संदिप पाटील :-**

का नाही करत.

**प्रमोद सामंत :-**

किती दिवसात झाले पाहिजे रि-सर्फिसिंग एखादी पाईपलाईन लिक झाल्यानंतर रि सर्फिसिंग असेल खड्डा खोदल्यानंतर किती दिवसात झाले पाहिजे हे बांधकाम विभागात का करीत नाहीत.

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब हे असेच चालले आहे. एक मुद्दा सांगतो पाईप लाईन टाकल्यानंतर बांधकाम विभाग रि-सर्फिसिंग करतो. परंतु पाईप लाईन टाकल्यानंतर त्याची टेस्टिंग त्याच्या वरची कनेक्शन असतील ते सिप्टींग हे सगळ झाल्यानंतर आपण रस्ता दुरुस्त करतो. आणी आपण पध्दत अवलंबली आहे पाणी पुरवठा विभाग असू दया, रिलायन्स असू दया ते अगदी बांधकाम विभागाकडून परवानगी घेतात. आणी त्याच वेळेस संबंधित इंजिनिअरला पण कळवितो व परवानगीची एक प्रत देतो. कारण जेणेकरुन ह्या विभागात १०० मिटर लाईन टाकलेली तिचे अंदाजपत्रक तयार करुन त्याची प्रोसेस साहेबांच्या निर्देशनास आणली होती. लवकरात लवकर रस्ते दुरुस्त होणार.

**प्रमोद सामंत :-**

चार महिने, तीन महिने, वर्षभर आम्ही खोलात जाऊ इच्छित नाही. वर्षभर तुमचा कॉन्ट्रॅक्टर बी.एम. करतो, शिलकोट टाकत नाही. पैसे घेतात. दिवाळीमध्ये माझ्या इथे पण लाईन टाकलेली आहे. अजून पर्यंत कोणी बघायला सुध्दा येत नाही. वरचे डांबरीकरण सोडा. परंतु जे काही माती काढलेली जाते व रॅबीट उचलले सुध्दा जात नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

पाणी पुरवठा विभाग असु द्या, बांधकाम विभाग असु द्या त्या दोघांना कॉ-ऑर्डीनेट करुन इथुन पुढे नागरिकांना गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

**शरद पाटील :-**

बारकुंड साहेब प्रत्येक वेळेला आम्ही सांगतो. त्या बी.पी. रोडला जेव्हा खोदतात, त्याच्यानंतर तिकडे कधीच पॅचवर्क होत नाही. आणि ते खोदले ना जेव्हा, तेव्हा बस आपटते तेव्हा सगळया बिल्डींग व्हायब्रेट करतात. आणि लोक असेच घाबरतात. रोज बिल्डींग पडते सांगितल्यावर जेव्हा व्हायब्रेट करते तेव्हा लोक रोज तिथे येऊन सांगतात की, तुम्ही ह्याच्यात काहीतरी करा, नाहीतर आमची बिल्डींग पडेल.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही जे हे हेड ५० लाखाच दाखवल आहे. ते ५० लाखाची तरतुद महापालिकेद्वारे, पाणी पुरवठा करण्याचा खाजगी टँकरचा प्रती फेरा दर निश्चित करणे बाबत. ५० लाख रु. आपण देतो. पर डे किती आले आणि मग त्याच इन्कम साईड कोणते दाखवता. पाणी आपण कोणाला फुकट देत नाही. आपण त्यांना ५० लाखाची मंजुरी देतो. ५० लाख फेरा जाते वेळी जाते. ५० लाख रु. दिले टँकरवाल्याला मग त्याच आपण किती रिसीट कापुन आपल्याला पैसे किती येतात.

**प्रविण पाटील :-**

आणि कुठल्या विभागात देतो. ते पण सांगा कशाप्रकारे देतो ते पण सांगा.

**सुरेश वाकोडे :-**

साहेब, आपण हा अंदाज लावला आहे. हा येणारा टोटल खर्च आहे. ह्याच्यामध्ये कस आहे की, एरियस जे आहे त्याचा रेट फायनल करतो आणि जे आपल्याकडे मागणी आहे त्या प्रमाणे आपण त्यांना चार्ज करतो. चार्ज करणारा रेट आहे तो ४५० रु. चा रेट आहे.

**रोहिदास पाटील :-**

४५० रु. आपण चार्ज करतो. आता कॉन्ट्रॅक्टरला आपण किती देतो.

**सुरेश वाकोडे :-**

३७० रु.देतो.

**रोहिदास पाटील :-**

म्हणजे आपल्याला ६० रु. मिळतात.

**सुरेश वाकोडे :-**

हो. आपण प्लसमध्ये येतो.

**रोहिदास पाटील :-**

दिवसाला फेरी किती झाल्या असतील?

**सुरेश वाकोडे :-**

फेरीच सांगु नाही शकत. कारण ८० फेऱ्या होतात कधी ६० फेऱ्या होतात. अस ते ॲव्हरेज फेऱ्या असतात.

**शरद पाटील :-**

आता जे ५० लाख दिले. ते किती दिवसाचे आहे?

**सुरेश वाकोडे :-**

एक वर्षासाठी आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १० :-**

आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. १० :-**

उपरोक्त विषयानुसार महानगरपालिका हद्दीत काही ठिकाणी पाणी पुरवठा सुधारणा होण्याच्या दृष्टीकोनातून खालील कामे करणे गरजेचे आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) येथे डोंगरी बर्फ फॅक्टरी ते आनंद नगर पर्यंत नविन बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु. ३८,७५,०००/- |
| २ | मिरारोड (पूर्व) येथे गिरीराज टॉवर ते शितल आर्केड इमारतीपर्यंत बिडाची वितरण जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रु. ३३,२८,४००/- |
| ३ | महानगरपालिकेद्वारे पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी टँकरचा प्रति फेरा दर निश्चित करणे. | रु. ५०,००,०००/- |

तरी वरील कामे करणे अत्यावश्यक असल्याने उपरोक्त कामांना मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. बर्नड डिमेलो ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

पाली व पातान परिसरात पाण्याची मोठी टाकी बांधण्यात यावी अशी माझी सुचना आहे.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या श्रीम. हेलन गोविंद ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

भाईंदर (पश्चिम) डोंगरी बर्फ फॅक्टरी ते आनंद नगर पर्यंत नवीन पाईप लाईन टाकण्याचे रुपये ३८ लाख ७५ हजाराचे काम आपण घेतले आहे. परंतु, त्याच्यापुढे पाईप लाईन अत्यंत खराब आहे. पाणी गळती मोठ्या प्रमाणात होते. परिणामी उत्तन, पाली व चौकच्या लोकांना पाणी कमी प्रमाणात मिळते. तेव्हा आनंद नगर (डोंगरी) पासून ते उत्तन पाण्याच्या टाकीपर्यंत बिडाची जलवाहिनी टाकण्याच्या कामाला आर्थिक व प्रशासकीय मंजूरी घ्यावी अशी माझी सुचना आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११, भाईंदर (पूर्व) बंदरवाडी स्मशानभूमीत Smoke Exhaust System बसविणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**बर्नड डिमेलो :-**

भाईंदर (पूर्व) बंदरवाडी स्मशानभूमी च्या सभोवताली इमारती असल्याने प्रेत दहन झाल्यावर निघणाऱ्या धुरामुळे इमारतीमधील रहीवाशांना त्रास होत असल्याने सदर ठिकाणी निघणारा धूर उंच आकाशात सोडण्याची आवश्यकता आहे. सदर ठिकाणी Smoke Exhaust System बसवावी लागणार असून त्याकरीता रु.२७.०० लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर कामासाठी सन २०१२-१३ या वर्षाच्या अर्थसंकल्पात स्मशानभूमी विकास लेखाशिर्षातर्गत रु.७५.०० लक्ष तरतूदीपैकी रु.३०.९६ लक्ष एवढी तरतूद उपलब्ध आहे. सदर Smoke Exhaust System बसविण्यास स्मशान भूमीत प्रेत दहनावेळी निघणारा धूर उंच आकाशात सोडल्याने रहिवाशांना त्रास होणार नाही. सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**राजेश वेतोसकर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ११ :-**

भाईंदर (पूर्व) बंदरवाडी स्मशानभूमीत Smoke Exhaust System बसविणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ११ :-**

भाईंदर (पूर्व) बंदरवाडी स्मशानभूमी च्या सभोवताली इमारती असल्याने प्रेत दहन झाल्यावर निघणाऱ्या धुरामुळे इमारतीमधील रहीवाशांना त्रास होत असल्याने सदर ठिकाणी निघणारा धूर उंच आकाशात सोडण्याची आवश्यकता आहे. सदर ठिकाणी Smoke Exhaust System बसवावी लागणार असून त्याकरीता रु.२७.०० लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर कामासाठी सन २०१२-१३ या वर्षाच्या अर्थसंकल्पात स्मशानभूमी विकास लेखाशिर्षातर्गत रु.७५.०० लक्ष तरतूदीपैकी रु.३०.९६ लक्ष एवढी तरतूद उपलब्ध आहे. सदर Smoke Exhaust System बसविण्यास स्मशान भूमीत प्रेत दहनावेळी निघणारा धूर उंच आकाशात सोडल्याने रहिवाशांना त्रास होणार नाही. सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. राजेश वेतोसकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२, पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**बर्नड डिमेलो :-**

**नमूना क्र. १० नियम ३०(३) पहा.**

| | या शिर्षातून | | | | | ह्या शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष** | **बांधकाम विषयक सेवा वगैरे** | **मुळ अनुदान** | **आज तारखे पर्यंतचे खर्च** | **उपलब्ध शिल्लक** | **प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष** | **बांधकाम विषयक सेवा वगैरे** | **मुळ अनुदान** | **आज तारखे पर्यंतचे खर्च** | **प्रस्तावित वाढीची रक्कम** | **अभिप्राय** |
| | | | | | | | | | | | |
| १ | बाजारपेठा आणि कत्तलखाने पृष्ठ क्र. ४३ | मार्केट बांधकाम | २००.०० लक्ष | ३१.७३ लक्ष | १६८.२७ लक्ष | स्मशानभूमी पृष्ठ क्र. ३३ | बेवारस प्रेत विल्हेवाट/ लाकडे खरेदी करणे. (स्मशानभूमी) | २५.०० लक्ष | २४.८२ लक्ष | २० लक्ष | "मार्केट बांधकाम" या लेखाशिर्षाखाली रु.२००.०० लक्ष एवढी तरतूद असून सदर लेखाशिर्षाखालील ३१ मार्च २०१३ पर्यत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातून बेवारस प्रेत विल्हेवाट लाकडे खरेदी करणे (स्मशानभूमी), या लेखाशिर्षाखाली रु.२० लक्ष, महापौर / आयुक्त / पदाधिकारी / अधिकारी निवास या लेखाशिर्षाखाली रु.९.०० लक्ष, सार्वजनिक तळी विहिरी दुरूस्ती या लेखाशिर्षात १.०० लक्ष, रस्ते देखभाल दुरुस्ती व सुधारणा या लेखाशिर्षकाखाली रु.१०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास शिफारस. |
| | | | | | | सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. ४ | महापौर/ आयुक्त पदाधिकारी/ अधिकारी निवास | ५.०० लक्ष | ५.०० लक्ष | ९.०० लक्ष | |
| | | | | | | बांधकामे पृष्ठ क्र. ३६ | तलाव, विहिरी दुरूस्ती | ५.०० लक्ष | ३.९० लक्ष | १.०० लक्ष | |
| | | | | | | बांधकामे पृष्ठ क्र. ३५ | रस्ते देखभाल दुरुस्ती व सुधारणा | १४०० लक्ष | ९०९.७८ लक्ष | १०० लक्ष | |
| २ | विकास आराखडा / अंमलबजावणी पृष्ठ क्र. ४५ | कम्यूनिटी सेंटर | २००.०० लक्ष | - | २००.०० लक्ष | सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. ४४ | जैसलपार्क सबवे | १५००.०० लक्ष | १३७४ लक्ष | १५०.०० लक्ष | कम्यूनिटी सेंटर या लेखाशिर्षा खालील २०० लक्ष एवढी तरतुद असून सदर |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | बांधकामे पृष्ठ क्र. ३५ | सार्व. इमारत दुरूस्ती | १०.०० लक्ष | ५.२० लक्ष | ३.०० लक्ष | लेखाशिर्षाखाली ३१ मार्च २०१३ पर्यत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातून जैसलपार्क सबवे या लेखाशिर्षाखाली रु.१५० लक्ष, सार्व. इमारत दुरूस्ती या लेखाशिर्षाखाली ३.०० लक्ष, सर्व धर्मिय उत्सव मंडप/लाईट व इतर या लेखाशिर्षाखाली १५.०० लक्ष, मुख्य कार्यालय फर्निचर/इमारत बांधकाम या लेखाशिर्षाखाली १५.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास शिफारस आहे. |
| | | | | | | बांधकामे पृष्ठ क्र. ३५ | सर्व धर्मिय उत्सव मंडप/लाईट व इतर | ७०.०० लक्ष | ६९.४५ लक्ष | १५.०० लक्ष | |
| | | | | - | | विकास आराखडा अंमलबजावणी पृष्ठ क्र. २५ | मुख्य कार्यालय फर्निचर/इमारत बांधकाम | १०.०० लक्ष | ०.७७ लक्ष | १५.०० लक्ष | |
| ३ | विकास आराखडा / अंमलबजावणी पृष्ठ क्र. ४५ | नाटयगृह | १००.०० लक्ष | | १०० लक्ष | शिक्षण मंडळ | शाळा इमारत दुरुस्ती, निगा | १५.०० लक्ष | १५.०० लक्ष | ५.०० लक्ष | "नाटयगृह" या लेखाशिर्षाखाली रु.१००.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखालील ३१ मार्च २०१३ पर्यत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातुन शाळा इमारत दुरुस्ती, निगा या लेखाशिर्षाखाली ५.०० लक्ष "जेसलपार्क सबवे" या लेखाशिर्षाखाली ४५.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास शिफारस आहे. |
| | | | | | | सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. ४४ | जैसलपार्क सबवे | १५००.०० लक्ष | १३७४ लक्ष | ४५.०० लक्ष | |
| ४ | सार्व. उद्याने पृष्ठ क्र. ४३ | उद्याने विकास / नविन बांधकाम | २०० लक्ष | १४.१३ लक्ष<br>- | १८५.८६ लक्ष | बांधकामे पृष्ठ क्र. ३५ | रस्ते देखभाल दुरुस्ती व सुधारणा | १४०० लक्ष | ९०९.७८ लक्ष | १०० लक्ष | "उद्याने विकास / नविन बांधकाम" या लेखाशिर्षाखाली २०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षा खालील ३१ मार्च२०१३ पर्यत होणारा खर्च पहाता |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | विकास आराखडा / अंमलबजावणी पृष्ठ क्र. ४५ | तरण तलाव | १०० लक्ष | | १०० लक्ष | रूग्णालये व दवाखाने पृष्ठ क्र. ४३ | भाईंदर (प.) हॉस्पीटल बांधकाम | ३००.०० लक्ष | ३००.०० लक्ष | ८०.०० लक्ष | सदर लेखाशिर्षातून रस्ते देखभाल दुरुस्ती व सुधारणा लेखाशिर्षाखाली रु.१००.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास शिफारस आहे.<br>“तरण तलाव” या लेखाशिर्षाखाली १०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखालील ३१ मार्च २०१३ पर्यत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातून भाईंदर (प.) हॉस्पीटल बांधकाम लेखाशिर्षाखाली रु.८०.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास शिफारस आहे. |

वरील पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

**राजेश वेतोसकर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

हॉस्पीटल तुम्ही बांधत नाही अशी भुमिका तुम्ही घेतलेली आहे. परत तुम्ही ८० लाख रु. वर्ग करता.

**शरद पाटील :-**

तुम्ही ह्याच्यात दिल आहे सर्व धर्मिय फंक्शनसाठी खर्च करतो. माझ्यामते आता आपण गणेश उत्सवाशिवाय दुसरा कुठेच खर्च करत नाही.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय, महत्वाचा विषय आहे की आपण जिथे प्रत्येक ह्याला तरतुद केली. आपल्याकडे तेवढे पैसे जमा आहे का? आपण वर्ग तर करतो इकडे. महापौर निवास ५ लाख सगळे तर ते इकडे जमा आहे का? बजेट नुसता फुगवुन ठेवलेला आहे. २२ करोडच मी जे तुम्हाला सांगितले, ते जे आपल्याकडे अवेलेबलच नाही. मग, ह्याच्यामधुन पण इकडे वर्ग करायचे प्रत्येक बाबतीत रस्ते देखभालचा खर्च आलेला आहे. तर रत्याची देखभाल कुठे होते. प्रत्येक रस्त्यामध्ये खड्डे पडलेले आहे. मग, हे जे प्रत्येक विभागाला १०० कोटी आणि १५० कोटी म्हणता. खड्डयाची दुरुस्तीच होत नाही. आणि नाट्यगृहाचा विषय का थांबला त्याच काम का होत नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने सांगतो. जो मुद्दा आपण सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. अंदाजपत्रक हे प्रशासनाकडुन मा. स्थायी समितीपुढे सादर केल जात. स्थायी समितीने शिफारस करुन मा. महासभेपुढे अंतिम मान्यता होते. त्यामुळे बजेटमध्ये तरतुद काय केलेली काय नाही केलेली ह्याच्यावर भाष्य करुन उचित होणार नाही. आणि जे हेड्स आहेत त्या हेडमधुन त्या हेडमध्ये बजेट अस वाढले जात नाही किंवा कमी होत नाही. जे आकडे एका ठिकाणी खर्च कमी होणार असेल तर ते दुसऱ्या हेडमध्ये कमी पडते तिथे मागणी केली आहे.

**प्रशांत दळवी :-**

ते बॅलेंस आहे का आपल्याकडे?

**शिवाजी बारकुंड :-**

बॅलेंस असल्याशिवाय सादरच केल जात नाही. अर्थ संकल्पीय तरतुद असल्याशिवाय प्रकरण आपल्यापुढे येत नाही.

**प्रशांत दळवी :-**

त्याच्यामध्ये रस्ते दुरुस्तीचे किती वर्ग करुन घेतलेला आहे?

**रोहिदास पाटील :-**

हॉस्पीटलच काय झाल? हॉस्पीटलच तुम्ही ट्रान्सफर मागितली. आपली भुमिका मा. महासभेत अशी ठरली आहे की, आपण खर्च करुन शकत नाही. आणि तुम्ही काम अक्षरशः थांबवलेलच आहे मग हे ८० लाख कशासाठी मागता?

**संदिप पाटील :-**

जे ८० लाख रु. हॉस्पीटलसाठी खर्च दाखवलेला आहे. त्याचा पहिला खुलासा करावा.

**शिवाजी बारकुंड :-**

वर्ग करतो.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही आधी वाचा. घाई करु नका. बऱ्याच तलावाशिर्षकाखालील १०० लक्ष एवढी तरतुद असुन सदर लेखाशिर्षाखालील ३१/३/२०१३ पर्यंत होणारा खर्च, सदर लेखाशिर्षातुन भाईंदर पश्चिम हॉस्पीटल बांधकाम लेखाशिर्षाखालील ८० लाख रु. एवढी रक्कम वर्ग होण्यास शिफारस आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

आता आपण करत नाही. परंतु जे झालेल आहे तेवढ पेमेंट त्यांना दयायच असेल. बांधकाम झालेल म्हणुन आपण ते वर्ग करतो. ह्याच्यापुढे नविन खर्च आपण करत नाही. मा. महासभेच्या ठरावानुसार आहे ह्याच स्थितीत बांधकाम करु.

**शरद पाटील :-**

पेमेंट अजुन दयायच बाकी आहे का?

**संदिप पाटील :-**

म्हणजे ८० लाख रु. पेमेंट देण गरजेच आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

पेमेंट देण म्हणजे केलेल काम असेल त्याच पेमेंट दयायलाच लागते. त्यानुसारच हे केल आहे. नविननुसार आम्ही करत नाही.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही ट्रान्सफरला विरोध करणार नाही. पण, पुढच्या मिटींगमध्ये हॉस्पीटलसाठी कोणाच किती देण बाकी आहे.

**संदिप पाटील :-**

पूर्ण खुलासा करावा.

**प्रशांत दळवी :-**

नाट्यगृहाचा विषय आहे. आपण ही जी तरतुद आता केली होती ती आपण इकडे वर्ग केलेली आहे. पुढे आपल काम चालु होणार आहे ना.

**शिवाजी बारकुंड :-**

परंतु, हे कस आहे. ३१ मार्च पर्यंत एका हेड खाली तरतुद केलेली आहे. परंतु आतापर्यंत मार्चपर्यंत तेवढा खर्च होणार नाही असा अंदाज आहे म्हणुन त्या हेडमधुन आपण वर्ग करतो. कॅन्सल करत नाही.

**प्रशांत दळवी :-**

म्हणजे तुम्ही हा अंदाज बांधलाय.

**शिवाजी बारकुंड :-**

हो.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रमोद सामंत :-**

मा. सभापती साहेब, मला ह्या विषयावर थोडस बोलायच आहे. बेसिकली या रि-अप्रोप्रिएशन विषयामध्ये आपण मार्केटसाठी पैसे ठेवले. मार्केट बांधल नाही. तरणतलावासाठी पैसे ठेवले तरण तलाव नाही घेतल. नाट्यगृहासाठी पैसे ठेवले, नाट्यगृहाचा प्रस्तावच आला नाही. तर मला हे सांगायच आहे की, आपण ज्यावेळी प्रोव्हिजन करतो त्यावेळी त्या गोष्टीचा प्रस्ताव आले पाहिजे. यामध्ये कम्युनिटी सेंटरचे सबवेच इथे रि-अप्रोप्रिएशन केलेल आहे. आपण गेल्या वेळेला सबवेच पैसे कमी केले होते. आता परत ते पैसे वाढवले आहेत.

**शिवाजी बारकुंड :-**

सबवेचं कसं आहे. मे पर्यंत सबवेच काम आहे. ते रेल्वे डिपार्टमेंटशी निगडीत आहे. त्याच्या अंडर ते काम आपले होत. त्यावेळेस एवढा वेग नव्हता कामाला. त्याच्यानंतर सर्व परवानग्या प्राप्त होऊन काम आता स्पीडमध्ये चालु आहे. ज्यावेळेस काम स्पीडमध्ये नव्हत, त्यावेळेस आपण कमी केले. परंतु आता जोरात काम चालु आहे. त्यामुळे त्याची रिक्वायरमेंट आपण परत टाकलेली आहे.

**प्रमोद सामंत :-**

पैसे पाहिजे. सगळ रि-अप्रोप्रिएशन केल पाहिजे. सगळ करा फक्त कुठेतरी ॲडमिनिस्ट्रेशन लॅप्सेस दिसतात ते झाले नाही पाहिजे अस मला वाटत. त्यासाठी आपल्याकडे ऑडिट विभाग आहे. ऑडिट विभागाची सगळयांनी मदत घेतली पाहिजे. ऑडिट रिपोर्ट लवकरात लवकर येवून दया. मा. सभापती साहेब लवकरात लवकर ऑडिट रिपोर्ट येण्यासाठी तुम्ही आदेश करावा अस वाटते.

**प्रकरण क्र. १२ :-**

पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. १२ :-**

**नमूना क्र. १० नियम ३०(३) पहा.**

| | या शिर्षातून | | | | | ह्या शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष** | **बांधकाम विषयक सेवा वगैरे** | **मुळ अनुदान** | **आज तारखे पर्यंतचे खर्च** | **उपलब्ध शिल्लक** | **प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष** | **बांधकाम विषयक सेवा वगैरे** | **मुळ अनुदान** | **आज तारखे पर्यंतचे खर्च** | **प्रस्तावित वाढीची रक्कम** | **अभिप्राय** |
| | | | | | | | | | | | |
| १ | बाजारपेठा आणि कत्तलखाने पृष्ठ क्र. ४३ | मार्केट बांधकाम | २००.०० लक्ष | ३१.७३ लक्ष | १६८.२७ लक्ष | स्मशानभूमी पृष्ठ क्र. ३३ | बेवारस प्रेत विल्हेवाट/ लाकडे खरेदी करणे. (स्मशानभूमी) | २५.०० लक्ष | २४.८२ लक्ष | २० लक्ष | "मार्केट बांधकाम" या लेखाशिर्षाखाली रु.२००.०० लक्ष एवढी तरतूद असून सदर लेखाशिर्षाखालील ३१ मार्च २०१३ पर्यत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातून बेवारस प्रेत विल्हेवाट लाकडे खरेदी करणे (स्मशानभूमी), या लेखाशिर्षाखाली रु.२० लक्ष, महापौर / आयुक्त / पदाधिकारी / अधिकारी निवास या लेखाशिर्षाखाली रु.९.०० लक्ष, सार्वजनिक तळी विहिरी दुरूस्ती या लेखाशिर्षात १.०० लक्ष, रस्ते देखभाल दुरुस्ती व सुधारणा या लेखाशिर्षकाखाली रु.१०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास शिफारस. |
| | | | | | | सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. ४ | महापौर/ आयुक्त पदाधिकारी/ अधिकारी निवास | ५.०० लक्ष | ५.०० लक्ष | ९.०० लक्ष | |
| | | | | | | बांधकामे पृष्ठ क्र. ३६ | तलाव, विहिरी दुरूस्ती | ५.०० लक्ष | ३.९० लक्ष | १.०० लक्ष | |
| | | | | | | बांधकामे पृष्ठ क्र. ३५ | रस्ते देखभाल दुरुस्ती व सुधारणा | १४०० लक्ष | ९०९.७८ लक्ष | १०० लक्ष | |
| २ | विकास आराखडा / अंमलबजावणी पृष्ठ क्र. ४५ | कम्यूनिटी सेंटर | २००.०० लक्ष | - | २००.०० लक्ष | सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. ४४ | जैसलपार्क सबवे | १५००.०० लक्ष | १३७४ लक्ष | १५०.०० लक्ष | कम्यूनिटी सेंटर या लेखाशिर्षा खालील २०० लक्ष एवढी तरतुद असून सदर |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | बांधकामे पृष्ठ क्र. ३५ | सार्व. इमारत दुरूस्ती | १०.०० लक्ष | ५.२० लक्ष | ३.०० लक्ष | लेखाशिर्षाखाली ३१ मार्च २०१३ पर्यत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातून जैसलपार्क सबवे या लेखाशिर्षाखाली रु.१५० लक्ष, सार्व. इमारत दुरूस्ती या लेखाशिर्षाखाली ३.०० लक्ष, सर्व धर्मिय उत्सव मंडप/लाईट व इतर या लेखाशिर्षाखाली १५.०० लक्ष, मुख्य कार्यालय फर्निचर/इमारत बांधकाम या लेखाशिर्षाखाली १५.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास शिफारस आहे. |
| | | | | | | बांधकामे पृष्ठ क्र. ३५ | सर्व धर्मिय उत्सव मंडप/लाईट व इतर | ७०.०० लक्ष | ६९.४५ लक्ष | १५.०० लक्ष | |
| | | | | - | | विकास आराखडा अंमलबजावणी पृष्ठ क्र. २५ | मुख्य कार्यालय फर्निचर/इमारत बांधकाम | १०.०० लक्ष | ०.७७ लक्ष | १५.०० लक्ष | |
| ३ | विकास आराखडा / अंमलबजावणी पृष्ठ क्र. ४५ | नाटयगृह | १००.०० लक्ष | | १०० लक्ष | शिक्षण मंडळ | शाळा इमारत दुरुस्ती, निगा | १५.०० लक्ष | १५.०० लक्ष | ५.०० लक्ष | “नाटयगृह” या लेखाशिर्षाखाली रु.१००.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखालील ३१ मार्च २०१३ पर्यत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातुन शाळा इमारत दुरुस्ती, निगा या लेखाशिर्षाखाली ५.०० लक्ष “जेसलपार्क सबवे” या लेखाशिर्षाखाली ४५.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास शिफारस आहे. |
| | | | | | | सार्वजनिक बांधकामे पृष्ठ क्र. ४४ | जैसलपार्क सबवे | १५००.०० लक्ष | १३७४ लक्ष | ४५.०० लक्ष | |
| ४ | सार्व. उद्याने पृष्ठ क्र. ४३ | उद्याने विकास / नविन बांधकाम | २०० लक्ष | १४.१३ लक्ष<br>- | १८५.८६ लक्ष | बांधकामे पृष्ठ क्र. ३५ | रस्ते देखभाल दुरुस्ती व सुधारणा | १४०० लक्ष | ९०९.७८ लक्ष | १०० लक्ष | “उद्याने विकास / नविन बांधकाम” या लेखाशिर्षाखाली २०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षा खालील ३१ मार्च२०१३ पर्यत होणारा खर्च पहाता |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | विकास आराखडा / अंमलबजावणी पृष्ठ क्र. ४५ | तरण तलाव | १०० लक्ष | | १०० लक्ष | रूग्णालये व दवाखाने पृष्ठ क्र. ४३ | भाईंदर (प.) हॉस्पीटल बांधकाम | ३००.०० लक्ष | ३००.०० लक्ष | ८०.०० लक्ष | सदर लेखाशिर्षातून रस्ते देखभाल दुरुस्ती व सुधारणा लेखाशिर्षाखाली रु.१००.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास शिफारस आहे.<br>"तरण तलाव" या लेखाशिर्षाखाली १०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखालील ३१ मार्च २०१३ पर्यत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातून भाईंदर (प.) हॉस्पीटल बांधकाम लेखाशिर्षाखाली रु.८०.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग होण्यास शिफारस आहे. |

वरील पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. राजेश वेतोसकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३, निविदांना मान्यता देणे (सार्व. बांधकाम विभाग)

**बर्नड डिमेलो :-**

| **अ.क्र.** | **कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव** | **अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर** |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| **१** | **भाईंदर (पू.) व (प.) यांना जोडणारा केबिन रोड येथे पादचारी पुलाचा रस्त्यामधील भाग श्री. सत्यनारायण मंदिर मार्गावर उतरविणे. (Third Call)**<br>अ) मे. प्रविण ट्रेडर्स | **रू.२४.३० लक्ष**<br><br>३६.१७ % जास्त दराने |

वरील निविदा ही तीन वेळेस प्रसिध्दी दिल्यानंतर प्राप्त झालेली आहे. सदर कामाचे दर जास्त वाटत असल्याने ठेकेदारास दर कमी करण्याबाबत पत्र देउन बोलविण्यात आले. तथापि चर्चे अंती ठेकेदाराने दर कमी करण्यास नकार देउन लेखी पत्र दिले. सदर पत्रात त्यांनी सदर कामाबाबत सविस्तर बाबीवर Rate Analysis करुन सादर केले आहे. सदर कामाच्या मूळ अंदाजपत्रकातील दर सन २०१०-११ या जिल्हा दरसुचीतील असून प्रत्यक्षात सदर काम Structural Steel मध्ये करावयाचे असून सदर बाबीचे जिल्हा दरसुचीतील दर व चालू बाजारभाव यामध्ये मोठयाप्रमाणावर तफावत आहे. त्यामुळे ठेकेदाराने सादर केलेले दर वाजवी आहेत. मंजूर दराने रु. ३३.०९ लक्ष सुधारीत खर्च अपेक्षित आहे. तरी सदर निविदेतील दरास व सुधारीत खर्चास मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

| **२** | **मिरा भाईंदर महानगरपालिका स्ट्रीट लाईट पोल वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे.** | | **रु. ६०,३३,६००/-** | | |
|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Description | Rate per installation / per Month | मे. आदित्य इलेक्ट्रीकल्स | **मे. शेखर इलेक्ट्रीकल्स** | मे. न्यू फिल्ड |
| | | | Rate per installation / per Month | Rate per installation / per Month | Rate per installation / per Month |
| 1. | Operation and maintenance of street lighting installation having 70W/150W/250W HPSV fixtures and lamps fitted on tubular poles with the Contractor material and manpower. The day to day works include the replacement of HPSV fixtures / fittings , bulbs chokes, ignitors accessories related to HPSV fixtures/fittings, contactors, timers (faulty photoswitches should be replaced by timers),accessories related to control gear , fuses , wires, PVC cables, bracket clamps, sealing end boxes , control boxes and location and rectification of cable faults replacing entire faulty repairing of non functioning installations, "ON and OFF" of street lights at designated times. The Contractors should be responsible for keeping at least 95 % of the installations in functioning mode by using their materials, manpower. | | 285 | **251.50** | 284 |

मे. शेखर इलेक्ट्रीकल्स यांची कमी दराच्या निविदेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

| **३** | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत सर्वधर्मीय उत्सवा अंतर्गत गणेशोत्सवाकरीता तसेच माघी गणपती / साखरचौथ इ. करीता मंडप,लाईट, स्टेज,पार्टीशन, स्पीकर सेंट, जनरेटर, टेबल, खुर्ची इत्यादी व्यवस्था करणे. | | रू.३०,००,०००/- | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | **मे. शिवलिला डेकोरेटर्स** | **मे. शार्गिद डेकोरेटर्स** | **मे. धारावी डेकोरेटर्स** | **दरवाटाघाटीनंतर चे दर** |
| **ITEM CODE** | **DESCRIPTION** | **Unit** | **RATE** | **RATE** | **RATE** | **RATE** |
| 1 | Mandap Water Proof | Sqft | 30 | 28 | 25 | 25 |
| 2 | Chair | No | 15 | 12 | 10 | 9 |
| 3 | Table | No | 50 | 45 | 40 | 39 |
| 4 | Generator | No | 18000 | 16000 | 15000 | 14500 |
| 5 | Wooden Railing | Rft | 60 | 60 | 40 | 35 |
| 6 | Speaker set | No | 6000 | 5900 | 5750 | 5500 |
| 7 | Halogen | No | 125 | 118 | 100 | 100 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 8 | HM Light | No | 6000 | 5800 | 4200 | 4100 |
| 9 | Stage a) 8 ft | Sqft | 73 | 70 | 59.50 | 59 |
| | Stage b) 6 ft | | 65 | 60 | 55.75 | 55 |
| | Stage C) 4 ft | | 53 | 50 | 40.25 | 40 |
| | Stage d) 2.5 ft | | 48 | 40 | 32.20 | 32 |
| 10 | Partition | Rft | 30 | 29 | 25 | 25 |
| 11 | Carpet | Sqft | 5 | 4 | 2.80 | 2.25 |
| 12 | Stand Fan | No | 500 | 455 | 395 | 390 |

वरील निविदेत दर वाटाघाटी नंतर चे दर वाजवी आहेत. मा. स्थायी समिती सभा अस्तित्वात नसल्याने व श्रीगणेश विसर्जन व्यवस्था करणे आवश्यक असल्याने मा. आयुक्त यांनी रु. २५.०० लक्ष खर्चाच निविदेस मान्यता दिली होती. सदर कामी मंजूर निविदेनुसार श्रीगणेश विसर्जन व्यवस्था करण्यात आली होती. तरी सदर रु. ३०.०० लक्ष खर्चाच्या निविदेतील दरांना कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**मुन्ना सिंग :-**

ह्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय, दो स्पष्टीकरण अधिकारी वर्ग ये चाहीए ये जो शेखर इलेक्ट्रीकल को मंजुरी दि है पिछले चार महिनोसे मै इलेक्ट्रीकल इंजिनिअर काकडे साहेब को फोन किया सुदामा नगर मे पोल है उसको ठिक करना चाहीए वो ठिक होता नही है बार बार बोल दिया खांबित साहेब नजर मे आय या फिर भी काम होता नही ऐसे ठेकेदार को कार्यवाही क्यो नही करते उसको फिर वापस ठेका मिलता है और दुसरा प्रश्न है इसमे जनरेटर वर्किंग अवर या नॉन वर्किंग अवर जनरेटर कॅपेसिटी स्पिकर कॅपॅसिटी मेन्शेन नही किया है १८,००० या १६,००० रुपये रेट है वो रेट कैसा है ये स्पष्टीकरण करे।

**शरद पाटील :-**

डॉ साहेबांनी सांगितले त्यालाच जोडून एक विषय आहे आम्ही गार्डन मध्ये प्रत्येक वेळेला सांगतो लाईट फुटलेली आहेत. लाईट रिपेरिंग करायची आहे ते कधीच होत नाही मग ठेका देऊन फायदा काय आहे? त्यांना आपण फुकटचे पैसे देतो का आपण?

**रोहिदास पाटील :-**

हे शेखर इलेक्ट्रीक आणि रिलायन्स शेखर इलेक्ट्रीकल ह्याला आपण कोणता ठेका देता आणि रिलायन्स ह्याला कोणता ठेका देतो. रिलायन्सवाले याला आपण भाडे पोटी पैसे देतो आपण रिलायन्सचे पोल रिलायन्सकडे याला आपण ६० लाखाचे काम.

**बारकुंड साहेब :-**

पहिला मुद्दा शेखर इलेक्ट्रीकल ऑपरेशन मेन्टेनचे काम आहे ते मिरा भाईंदर महापालिकेने लावलेले पोल्स आहेत हे पोल्स रिलायन्स कंपनीने लावलेले नाहीत त्यामुळे ह्या पोलची दुरुस्ती महापालिकेला करावी लागते. त्या पोलची संख्या तुम्हाला सांगतो जवळ जवळ २१०० पोल हे महापालिकेने लावलेले आहेत जिथे अरुंद गल्ल्या आहेत जिथे झोपडपट्टी आहेत अशा ठिकाणी रिलायन्स पोल लावत नाहीत त्या ठिकाणी आपण लावलेले आहेत आणि ह्यांची देखभाल दुरुस्ती आपण करतो आणि दुसरा पार्ट आहे रिलायन्स स्ट्रिट लाईट आहे त्याची देखभाल दुरुस्ती रिलायन्स कंपनी करते त्याच्यामध्ये अंतरभाव नाही.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

सुदामा नगर का पोल शेखर इलेक्ट्रीकल के पास है।

**राजेश वेतोसकर :-**

साहेब, तो वेळेवर काम करत नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

कुठलं काम सांगा ना?

**शरद पाटील :-**

बारकुंड साहेब, मिटींगला आल्यानंतर फक्त काम सांगायची आणि आम्ही सांगितलेली काम करायची नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

तुम्ही काम सांगा ना.

**शरद पाटील :-**

व्यंकटेश्वर गार्डनमध्ये आज ६-७ वर्ष झाली तिकडची एक पण लाईट बदली होत नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, हे स्ट्रिट लाईट ऑपरेशन मेन्टनन्स आहे आणि आपण गार्डनची दुरुस्ती सांगता.

**शरद पाटील :-**

मग गार्डनची दुरुस्ती नाही आहे की?

**शिवाजी बारकुंड :-**

ह्याच्यामध्ये गार्डनची दुरुस्ती नाही आहे फक्त इलेक्ट्रीक पोलची दुरुस्ती आहे.

**शरद पाटील :-**

ही फक्त इलेक्ट्रीकची आहे आपण पर्सनल सेकंड कंस्ट्रक्शन...

**शिवाजी बारकुंड :-**

जे पोल महापालिकेने लावलेली आहे त्या पोलची देखभाल दुरुस्ती आहे.

**राजेश वेतोसकर :-**

साहेब, गार्डनच्या पोलची दुरुस्ती कोणाकडे आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

महापालिकाचं करते पण हा विषय त्याच्याशी संबंधीत नाही.

**राजेश वेतोसकर :-**

शेखरशी तरी संबंधीत आहे की नाही.

**शरद पाटील :-**

त्यांचा ठेकेदार कोण आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

कुठला?

**शरद पाटील :-**

गार्डन वगैरे रिपेरींग करतो, त्याचा ठेकेदार कोण आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

शेखरच आहे.

**शरद पाटील :-**

विषय तोच झाला ना म्हणजे तो विषय येईपर्यंत वाट बघायची का?

**राजेश वेतोसकर :-**

शेखर तर कॉमनच आहे ना ह्याच्यामध्ये का त्याच्यामध्ये

**शिवाजी बारकुंड :-**

कामं वेगळी वेगळी असतात.

**रोहीदास पाटील :-**

प्रत्येक पोलची किंमत ३ हजार रुपये म्हणजे प्रत्येक पोलला ३ हजार रुपये खर्च झाला.

**शिवाजी बारकुंड :-**

असं नाही काही ठिकाणी पोल बदलावे लागतात काही ठिकाणी केबल बदलायला लागते. पुर्ण वार्षिक पर पोल असेल तर डिवाईड बाय ६० लाख डिवाईड बाय २१०० पोलची ३ हजार फिगर काढली असं होत नाही.

**प्रशांत दळवी :-**

साहेब, आपण जे म्हणता ना की, महानगरपालिकेमार्फत जे पोल बसविण्यात आले तर तुम्ही आकडा किती सांगितला?

**शिवाजी बारकुंड :-**

२१००

**प्रशांत दळवी :-**

२१०० तर त्यातले किती चालु आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

त्याबद्दल माहिती घेऊन सांगतो.

**प्रशांत दळवी :-**

साहेब आम्ही वारंवार तक्रार करतो गार्डन प्रस्तावित केलेल्यांची देखभाल करता.............

**शिवाजी बारकुंड :-**

सन्मा. सदस्य साहेब, हा विषय स्ट्रिट लाईन जे झोपडपट्टी किंवा ह्याच्यामध्ये आहे त्याच्यामधल्या तुमचा दुसरा मुद्दा असेल उद्यानामधले लाईटला नादुरुस्त असतील त्याच्यावर ताबडतोब.............

**प्रशांत दळवी :-**

ह्याच्यामध्ये त्या लाईट पकडल्या नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

नाही मी सांगतो ना तो विषय वेगळा आहे हा विषय वेगळा आहे.

**प्रशांत दळवी :-**

त्याचा ठेका दिला आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

दिलेला आहे त्याच्यावर ॲक्शन घेऊ लगेच नादुरुस्त असेल तर ताबडतोब दुरुस्त करुन घेऊ.

**प्रशांत दळवी :-**

साहेब, ४ महिने झाले मी ओरडतो सेक्टर क्र.२ चे गार्डन आणि सेक्टर क्र.४ चे गार्डन तुम्ही थोडसं नोट डाऊन कराना तिथे गेल्या ४ महिन्यापासुन लाईट नाही वारंवार तक्रार केलेली आहे.

**संदीप पाटील :-**

बारकुंड साहेब, माझी एक सुचना आहे तम्हीु स्ट्रीट लाईट जे आहे ते चेक करण्यासाठी संध्याकाळी जो माणुस पाठवता त्याच्यामध्ये थोडी वाढ करावी कशामुळे तुम्ही वाढ करत नाही म्हणून एरीया कंम्प्लीट होत नाही आता आमच्या राई, मुर्धा, मोरवा डोंगरी भाईंदर या विभागात फक्त एकच मनुष्य आहे स्ट्रिट लाईट चेक करायला ४ विभागामध्ये तुम्ही २ या ३ माणसं दिली तर त्याचा पाठपुरावा चांगल्या पध्दतीने होईल.

**शिवाजी बारकुंड :-**

आपल्या स्थायी समितीचा रिपोर्ट करुन आयुक्त साहेबांकडे सबमिट करतो.

**संदीप पाटील :-**

तुम्ही माणसं वाढवली ना तर कुठे स्ट्रीट लाईट बंद होणार नाही आपल्याला प्रॉब्लेम सॉल्व करता येईल.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

बारकुंड साहेब, यह जो रजिस्टर मेन्टेन किया जाता है आपके द्वारे उसमे पिछले ४ महिनेसे कंम्प्लेंट लिख रहा हूँ। वह रजिस्टर कोई चेक करता है क्या डिपार्टमेंट के अंदर वह जरा नोट करलो।

**प्रमोद सामंत :-**

मा. सभापती साहेब, विषय असा आहे शेखर इलेक्ट्रीकलकडे बरेचसे इलेक्ट्रीकल संबंधीत कॉन्ट्रॅक्ट आहेत तर आपण त्याला सक्त ताकीद देण्यात यावे की ज्या ज्या तक्रारी असतात त्या वेळेवर अटेंन्ड कराव्यात कारण सगळे जण बोलतात त्याच काहीतरी महत्व आहे. आपण बोलायचं त्यांनी हा म्हणायचं त्याने फोन करायचा तुमच्या काकडे साहेबांना फोन करायचा.

**शिवाजी बारकुंड :-**

संबंधीत ठेकेदाराला काम करण्यामध्ये पर्टीक्युलर जे जे काम असेल त्याला जे कार्यादेश देण्यात येत असेल त्यानुसार सक्त ताकिद देण्यात येईल.

**प्रमोद सामंत :-**

तुमच्या कार्यादेशामध्ये काही नाही तुम्ही कुठेही कंडीशन अप्लाय नाही केलेली आहे तर पुढच्या वेळेला ती पण टाकावी.

**हेलन गोविंद :-**

सन्मा. बारकुंड साहेब मी ज्या गावामध्ये स्थानिक नगरसेविका आहे माझ्या चौक गावामध्ये अर्ध्या गावामध्ये दगडावरती पोल बसवला आहे अर्धा गाव आमचा राहीला आहे मग तिथे का बसवत नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

प्रस्ताव तयार करण्यात येईल.

**हेलन गोविंद :-**

बारकुंड साहेब, आमच चौक गाव तुम्हाला माहित आहे खाली ओढ आहे लोकांना खुप त्रास होतो कोणाचे पाय पण मोडलेले आहे गरज आहे आमच पाचव टर्म आहे.

**शरद पाटील :-**

आपण जे फुटवेअर ब्रिज आता बांधतो तो ह्यासाईडला खाली उतरतो म्हणजे तिकडनं आपण रस्ता मोकळा करणार का? त्या ब्रिजची हाईट काय असेल?

**शिवाजी बारकुंड :-**

इथुन उतरण्या ऐवजी त्याबाजुने उतरणार आहे.

**शरद पाटील :-**

माझं म्हणणं असं आहे की जी हाईट असेल म्हणजे आता गणेश विर्सजन असते गणेश मुर्त्यांची हाईट पाहिजे तेवढी असते.

**शिवाजी बारकुंड :-**

त्याला कुठल्याही प्रकारचा अडथळा येणार नाही रेल्वेवरची जी हाईट आहे.

**शरद पाटील :-**

तांत्रिक दृष्ट्या बघुन घ्या अन्यथा तसं होत नसेल तर रीस्ट्रीक्शन द्या मंडळावर करा नाहीतर नंतर मोठा प्रॉब्लेम  उभा राहीलं.

**शिवाजी बारकुंड :-**

रेल्वेच्या पॅनलची जी हाईट आहे ती हाईट आहे.

**रोहीदास पाटील :-**

हा सबवेचा विषय नाही आपण गणपती विसर्जनाच्या मुर्तीच्या हाईटचा आहे आम्ही तुम्हाला विनंती करतो लेखी पत्र देतो तुमच्या लक्षात येते की, नाही हा विषय वेगळा पण जेव्हा सदस्य सांगतात लेखी निवेदन करतात जी गणपती मंडळाची बैठक घ्या त्याची मुर्ती, उंची वजन काय असावं दरवेळी महापालिका एवढा खर्च करते महापालिका बदनाम होते ह्यावर्षी चार मुर्ती खंडीत झाल्या का झाल्या? गणेश मंडळात सभेचा निर्णय घ्या मा. सभापती साहेब हा चांगला निर्णय आहे तुमच्या अधिपत्या खाली घ्या. आणि आयुक्तांना सांगा सर्व मंडळांना बोलवा उंची किती असावी किती वजन असावे.............

**मा. सभापती :-**

ह्या विषयावर आपण नंतर चर्चा करु.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मेरा दुसरे सवाल का जवाब नही मिला मुझे, जनरेटर और स्पिकर पे इतना फरक आता है। उसपे जस्टीफिकेशन नही है। इतना बडा बडा खर्चा लिखा हुआ है।

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे. आणि संबंधित ठेकेदार आहे त्यांनी संदस्यांच्या समस्यावर अडचण केली तर त्यांच्यावर कारवाई करावी असा मी आदेश देतो. पुढचा विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. १३ :-**

निविदांना मान्यता देणे (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. १३ :-**

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| **१** | **भाईंदर (पू.) व (प.) यांना जोडणारा केबिन रोड येथे पादचारी पुलाचा रस्त्यामधील भाग श्री. सत्यनारायण मंदिर मार्गावर उतरविणे. (Third Call)**<br>अ) मे. प्रविण ट्रेडर्स | **रू.२४.३० लक्ष**<br><br>३६.१७ % जास्त दराने |

वरील निविदा ही तीन वेळेस प्रसिध्दी दिल्यानंतर प्राप्त झालेली आहे. सदर कामाचे दर जास्त वाटत असल्याने ठेकेदारास दर कमी करण्याबाबत पत्र देउन बोलविण्यात आले. तथापि चर्चे अंती ठेकेदाराने दर कमी करण्यास नकार देउन लेखी पत्र दिले. सदर पत्रात त्यांनी सदर कामाबाबत सविस्तर बाबीवर Rate Analysis करुन सादर केले आहे. सदर कामाच्या मूळ अंदाजपत्रकातील दर सन २०१०-११ या जिल्हा दरसुचीतील असून प्रत्यक्षात सदर काम Structural Steel मध्ये करावयाचे असून सदर बाबीचे जिल्हा दरसुचीतील दर व चालू बाजारभाव यामध्ये मोठयाप्रमाणावर तफावत आहे. त्यामुळे ठेकेदाराने सादर केलेले दर वाजवी आहेत. मंजूर दराने रु. ३३.०९ लक्ष सुधारीत खर्च अपेक्षित आहे. तरी सदर निविदेतील दरास व सुधारीत खर्चास मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

| **२** | **मिरा भाईंदर महानगरपालिका स्ट्रीट लाईट पोल वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे.** | | **रु. ६०,३३,६००/-** | | |
|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Description | Rate per installation / per Month | मे. आदित्य इलेक्ट्रीकल्स<br>Rate per installation / per Month | **मे. शेखर इलेक्ट्रीकल्स**<br>Rate per installation / per Month | मे. न्यू फिल्ड<br>Rate per installation / per Month |
| 1. | Operation and maintenance of street lighting installation having 70W/150W/250W HPSV fixtures and lamps fitted on tubular poles with the Contractor material and manpower. The day to day works include the replacement of HPSV fixtures / fittings , bulbs chokes, ignitors accessories related to HPSV fixtures/fittings, contactors, timers (faulty photoswitches should be replaced by timers),accessories related to control gear , fuses , wires, PVC cables, bracket clamps, sealing end boxes , control boxes and location and rectification of cable faults replacing entire faulty repairing of non functioning installations, “ON and OFF” of street lights at designated times. The Contractors should be responsible for keeping at least 95 % of the installations in functioning mode by using their materials, manpower. | | 285 | **251.50** | 284 |

मे. शेखर इलेक्ट्रीकल्स यांची कमी दराच्या निविदेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

| ३ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत सर्वधर्मीय उत्सवा अंतर्गत गणेशोत्सवाकरीता तसेच माघी गणपती / साखरचौथ इ. करीता मंडप,लाईट, स्टेज,पार्टीशन, स्पीकर सेंट, जनरेटर, टेबल, खुर्ची इत्यादी व्यवस्था करणे. | | रू.३०,००,०००/- | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | **मे. शिवलिला डेकोरेटर्स** | **मे. शार्गिद डेकोरेटर्स** | **मे. धारावी डेकोरेटर्स** | **दरवाटाघाटीनंतर चे दर** |
| **ITEM CODE** | **DESCRIPTION** | **Unit** | **RATE** | **RATE** | **RATE** | **RATE** |
| 1 | Mandap Water Proof | Sqft | 30 | 28 | 25 | 25 |
| 2 | Chair | No | 15 | 12 | 10 | 9 |
| 3 | Table | No | 50 | 45 | 40 | 39 |
| 4 | Generator | No | 18000 | 16000 | 15000 | 14500 |
| 5 | Wooden Railing | Rft | 60 | 60 | 40 | 35 |
| 6 | Speaker set | No | 6000 | 5900 | 5750 | 5500 |
| 7 | Halogen | No | 125 | 118 | 100 | 100 |
| 8 | HM Light | No | 6000 | 5800 | 4200 | 4100 |
| 9 | Stage a) 8 ft | Sqft | 73 | 70 | 59.50 | 59 |
| | Stage b) 6 ft | | 65 | 60 | 55.75 | 55 |
| | Stage C) 4 ft | | 53 | 50 | 40.25 | 40 |
| | Stage d) 2.5 ft | | 48 | 40 | 32.20 | 32 |
| 10 | Partition | Rft | 30 | 29 | 25 | 25 |
| 11 | Carpet | Sqft | 5 | 4 | 2.80 | 2.25 |
| 12 | Stand Fan | No | 500 | 455 | 395 | 390 |

वरील निविदेत दर वाटाघाटी नंतर चे दर वाजवी आहेत. मा. स्थायी समिती सभा अस्तित्वात नसल्याने व श्रीगणेश विसर्जन व्यवस्था करणे आवश्यक असल्याने मा. आयुक्त यांनी रु. २५.०० लक्ष खर्चाच निविदेस मान्यता दिली होती. सदर कामी मंजूर निविदेनुसार श्रीगणेश विसर्जन व्यवस्था करण्यात आली होती. तरी सदर रु. ३०.०० लक्ष खर्चाच्या निविदेतील दरांना कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. मुन्ना सिंग**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४, भाईंदर (पुर्व), भाईंदर (प.), मिरारोड ते चेणा व मुर्धा ते उत्तन विभाग बाजार लिलाव (१२ महिन्यांच्या कालावधीकरिता) बोली रक्कम स्विकारणेस मंजुरी देणे.

**बर्नट डिमेलो :-**

प्र. क्र. १४ चा ठराव टाईप करणे.

**राजेश वेतोसकर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे. तसेच सर्व सन्मा. नगरसेवक सर्व उपस्थित अधिकारी आजची ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पूर्ण झाली आणि सर्वांनी एकमेकांना सहकार्य केले त्या बद्दल आभार मानतो आणि ही सभा संपली असे मी जाहिर करतो.

**प्रकरण क्र. १४ :-**

भाईंदर (पुर्व), भाईंदर (प.), मिरारोड ते चेणा व मुर्धा ते उत्तन विभाग बाजार लिलाव (१२ महिन्यांच्या कालावधीकरिता) बोली रक्कम स्विकारणेस मंजुरी देणे.

**ठराव क्र. १४ :-**

मिरा भाईंदर शहरामध्ये विविध ठिकाणी फेरीवाला क्षेत्र निश्चित करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच सदरच्या फेरीवाल्यांकडून बाजार फी वसुल करण्याचे काम ठेकेदाराच्या माध्यमातून करण्यात येते. केंद्रशासनाने राष्ट्रीय फेरीवाला धोरण निश्चित केलेले आहे. त्याअनुषंगाने प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यामध्ये या विषयाचा उल्लेख स्पष्ट केलेला नाही.

तरी फेरीवाल्यांकडून बाजार फी वसुली करणाऱ्या लिलाव पध्दतीने काढण्यात आलेल्या निविदांच्या मंजूरीचा विषय पुढील मा. स्थायी समितीमध्ये घेण्यात यावा, असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. राजेश वेतोसकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व सन्मा. नगरसेवक, सर्व उपस्थित अधिकारी आजची ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पूर्ण झाली आणि सर्वांनी एकमेकांना सहकार्य केले त्या बद्दल आभार मानतो आणि ही सभा संपली असे मी जाहिर करतो.

**(सभा संपल्याची वेळ दुपारी ०१.१० वा.)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**